## श्रीकृष्णांनी दिली गीता आणि श्रीरामकृष्णांनीं दिले विवेकानंद

त्याग व सेवा हीं जीं भारतवर्षाचीं मुख्य ध्येयें तीं आपल्याला स्वामीजींच्या जीवनांत पूर्णत्वाला पोंचलेलीं दिसून येतात. सगळ्या उपनिषदांचें सार मानली जाणारी गीताच जणूं काय हाडामासांचें शरीर घेऊन, स्वामी विवेकानंदांच्या रुपानें, धर्म आणि नीति यांपासून च्युत होणाऱ्या जगताला योग्य मार्गदर्शन करण्यासाठीं, अवतरली असें म्हटल्यास अतिशयोक्ति मुळींच होणार नाहीं. येशूख्रिस्ताने जसें म्हटलें होतें कीं, ( त्यांच्या पूर्वजांनीं प्रणीत केलेल्या धर्मांतील केवळ ) उणीवा भरुन काढण्यासाठीं ते आले होते त्यांच्या विरुद्ध बंड पुकारण्यास नव्हे तसेंच स्वामी विवेकानंदांच्या बाबतींतही म्हणतां येईल. आमच्या प्राचीन धर्मतत्त्वांना उजाळा देण्यासाठीं, त्यांना नवचैतन्य देण्यासाठीं स्वामीजींचा अवतार झाला. त्यांना कोणत्याही धर्माविरुद्ध किंवा मताविरुद्ध आपलें नवीन मत मांडावयाचें नव्हतें. स्वामीजी वेदान्तधर्माला, किंबहुना जगांतील सर्व धर्मांनां, दृढता आणण्यासाठीं अवतरले होते. त्यांनीं कोणताही नवीन पंथ निर्माण केला नाहीं किंवा मत प्रतिपादन केलें नाहीं. जुन्या व प्राचीन विचारांनां नवीन परिस्थितीप्रमाणें योग्य असें स्वरुप त्यांनीं दिलें. स्वामीजी हे आमच्या युगाच्या अत्यंत श्रेष्ठ अशा अवताराचे - ज्या अवताराने या जगांतील सर्व धर्म व पंथ एकाच ध्येयाकडे मार्गक्रमणा करतात असें प्रतिपादन केलें, आणि त्यायोगें सर्वच धर्मांना दृढता आणली, अशा त्या आधुनिक अवताराचे- प्रमुख शिष्य.

गीतेच्या शिकवणींत आणि स्वामीजींच्या जीवनांत आम्हांला विलक्षण साम्य दिसून येतें. गीतेच्या शिकवणीचें स्थान कुरुक्षेत्र हें सर्वांना माहित आहेच. या क्षेत्रावर झालेलें हें युद्ध कौरव व पांडव यांच्यामध्यें झालें. या कुरुक्षेत्राला गीतेंत धर्मक्षेत्रही म्हटलें आहे. **' इदं शरीरं कौन्तेय क्षेत्रमित्यभिधियते '** - हें शरीर म्हणजे क्षेत्र जरी असलें तरी तें धर्मक्षेत्र व कुरुक्षेत्र थोडक्यांच्याच बाबतींत होत असतें. आणि स्वामी विवेकानंदांच्या शरीरांत तें खरेंखुरें धर्मक्षेत्र आणि कुरुक्षेत्र झालें होतें. जेव्हां धर्मासाठीं म्हणून या शरीरांतील विरुद्ध स्वभावाच्या प्रकृतींत लढाई होण्यास सुरवात होते, जेव्हां कर्तव्य- कर्माचें पालन करण्यासाठीं म्हणून निरंतर प्रयत्न

करण्यांत येतात, त्याचवेळीं हें शरीर धर्मक्षेत्र व कुरुक्षेत्र होतें. प्रत्येक माणसांत दोन प्रकारच्या प्रवृत्ति असतात असें आम्हांला गीतेच्या सोळाव्या अध्यायांत सांगितलें आहे. त्यांपैकीं एकीला दैवी संपत् व दुसरीला आसुरी संपत् असें नांव दिलें आहे. ज्या शरीरांत धर्माचा जय होतो, कर्तव्यबुद्धीला, सदसद्विवेकबुद्धीला यश येतें, तें शरीर म्हणजेच धर्मक्षेत्र किंवा कुरुक्षेत्र होय. प्रत्येक माणसाच्या अंतःकरणांत जरी या दोन्ही प्रकारच्या दैवी व आसुरी प्रवृत्ति असल्या तरी त्यांत आसुरी प्रवृत्तीचा प्रभाव जास्त असल्याकारणानें दैवी प्रवृत्ति दुर्बल अवस्थेंत असते. अत्यंत विरळ अशा व्यक्तींमध्यें मात्र ही दैवी प्रवृत्ति आसुरी प्रवृत्तीवर मात करुन धर्माला विजय प्राप्त करुन देते, अखंड सुख मिळवून देते, व स्वानंदसाम्राज्याची प्राप्ति करुन देते. अशा या धर्मप्रवृत्ति व अधर्मप्रवृत्ति यांजमध्यें होणाऱ्या लढ्यांत धर्माचा विजय व्हावयाचा असेल तर धर्मप्रवृत्ति अधिक शक्तिशाली असली पाहिजे, हें ओघानेंच येतें. आतां या भारतीय युद्धांतील कौरव आणि पांडव म्हणजेच आसुरी आणि दैवी संपत् होत असें मानायला हरकत नाहीं. कारण कौरव राजा धृतराष्ट्र हा अंध व लोभी आहे असें दाखविण्यांत आलें आहे. अंध म्हणजे अज्ञानी, दूरदृष्टि नसलेला. लोभी किंवा कृपण याचा अर्थ असा कीं, जो आपल्या हिताच्या गोष्टींचा विचार न करतां केवळ इंद्रियसुखाच्या म्हणजेच नश्वरसुखाच्या पाठीमागें लागलेला असतो तो. यांच्या विरुद्ध पांडवांचा मुख्य म्हणजे धर्मराज. तेव्हां धर्म आणि धृतराष्ट्र यांच्यामधील हा लढा म्हणजे काम आणि निष्कामता यांच्या मधील लढाई होय. निर्लोभता किंवा निष्कामता म्हणजेच धर्म, आणि काम व लोभ म्हणजेच अधर्म. गीतेच्या तिसऱ्या अध्यायांत अर्जुन भगवंताना विचारतो कीं इच्छा नसताना देखील माणूस हे भगवन् पापकर्मामध्यें कसा प्रवृत्त होतो. तेव्हा भगवान त्याला म्हणतात,

**'' काम एष क्रोध एष रजोगुणसमुद्भवः ।**
**महाशनो महापाप्मा विद्ध्येनमिह वैरिणम् ।। "**

काम किंवा लोभ हा सर्व पापांची जननी आहे. तो अत्यंत पापी व सर्वांना भक्षण करणारा असा मनुष्याचा वैरी आहे. तेव्हां हें कौरवपांडवांचें युद्ध म्हणजे धर्म व अधर्म, लोभ व निर्लोभता यांमधील युद्ध होय. धृतराष्ट्राच्या पुत्रांचीं नांवें – दुर्योधन, दुःशासन, दुर्धर्ष, दुर्मुख हीं सगळीं ' दुः

' ने सुरवात झालेलीं आहेत. हीं शौर्य व वीर्य यांचीं सूचक असलीं तरी तीं माणसांतील क्रौर्य वा दुष्ट प्रवृत्ति दाखविणारीं आहेत. उलट पांडवांचीं नांवें युधिष्ठिर, भीम, अर्जुन, नकुल व सहदेव. हीं- संकटकाळीं देखील स्थिरता, अतुल पराक्रम व धैर्य, ऋजुता किंवा मनाचा सरळपणा, कुलधनादिकांच्या ठिकाणीं अनासक्ति, व देवाच्या सहवासाची म्हणजे ईश्वरचिंतनाची ओढ हे गुण दर्शवितात. तेव्हां कौरव-पांडवामधील युद्ध म्हणजे या दैवी आणि आसुरी गुणांमधील लढाईच वाटते. नाहीं का ?

युद्धाच्या पूर्वदिवशीं अर्जुनाची युद्ध करण्याकडेच प्रवृत्ति होती. इतकेंच नव्हे तर प्रत्यक्ष रणांगणावर गेल्यानंतर सुद्धां अर्जुन श्रीकृष्णाला आपला रथ दोन्ही सैन्यांच्या मध्यभागीं नेण्यास सांगतो व युद्ध करण्यास सज्ज होऊन राहतो. पण एकाएकीं त्याच्या निष्पाप वीर अंतःकरणावर मोह व अज्ञान याचें पटल येतें आणि तो आपलें गांडीव धनुष्य खालीं ठेवून रथांतून खालीं उडी टाकण्याच्या तयारींत असतो. जन्मजात शूरवीर असलेल्या, कर्तव्यनिष्ठ असलेल्या अर्जुनाच्या मनांत अशाप्रकारचे भीरुत्वाचे विचार येण्याचें कारण काय? त्याच्या समोर त्याचे आप्तेष्ट दिसले म्हणूनच तो लढाईपासून निवृत्त होऊं पहात होता काय? त्याच्या समोर आलेल्या आप्तेष्टांबद्दल वाटणाऱ्या केवळ दयेमुळेंच त्याला असें वाटणें संभवनीय नाहीं. कारण आपल्या नातेवाईकांविरुद्ध आपणांस लढाई करावयाची आहे हें जाणूनच तो रणांगणावर आला होता. त्याच्या मोहाचें निदान आपण शोधूं गेलों तर आपल्याला असें दिसून येईल कीं, त्या युद्धाच्या पूर्वदिवशीं संजयाशीं झालेला संवादच याला कारणीभूत झाला होता. दुःसहवासाचे आणि दुरुपदेशाचे किती घोर परिणाम होतात तें आम्हांला इथें स्पष्ट दिसून येतें. युद्धाच्या पूर्वी अर्जुनापाशीं झालेलें संजयाचें संभाषण आम्हांला महाभारताच्या संजययानपर्वांत सांपडतें. संजयाने अर्जुनाला जो उपदेश केला होता तोच त्याने दुसऱ्या दिवशीं श्रीकृष्णाला म्हणून दाखविला. सुविचारापेक्षां कुतर्क आणि कुविचार यांचा पगडा माणसाच्या मनावर लवकर बसतो; आणि तो साधुवृत्तीच्या आणि कर्तव्यनिष्ठ माणसाला सुद्धां काहीं काळ आपल्या कह्यांत ठेवतो. अशीच परिस्थिति आम्हांला स्वामी विवेकानंदांच्या जीवनांत दिसून येते.

स्वामीजी हे जन्मतःच ध्यानसिद्ध, धर्मनिष्ठ आणि कर्तव्यनिष्ठ पुरुष

होते. त्यांची कठोर सत्यपरायणता, प्रगाढ मातृप्रेम, अतुल धैर्य, अलौकिक बुद्धि वगैरे आमचे डोळे दिपविल्यावांचून रहात नाहींत. अगदीं लहानपणापासून ध्यानामध्यें बेहोष होऊन देहभान विसरणारे विवेकानंद, पाश्चात्य विचारसरणीचा पगडा त्यांच्या मनावर बसतांच प्रत्यक्ष परमेश्वराच्या अस्तित्वाबद्दल सुद्धां साशंक होऊं लागले. त्यांना वाटूं लागलें कीं, माणसाला परमेश्वरसाक्षात्कार करुन घेणें जवळ जवळ अशक्यच. सगुण साकार परमेश्वर तर ते मानीनातसे झाले. अर्जुनाला ज्याप्रमाणें रणांगणावर येतांच भूल पडली, तसेच स्वामीजीसुद्धां कांहीं काळ भ्रांत झालेले आम्हांला दिसून येतात. मोहग्रस्त झालेला अर्जुन मग ज्याप्रमाणें श्रीकृष्णाला शरण जातो व म्हणतो,

'' **कार्पण्यदोषोपहतःस्वभावः पृच्छामि त्वां धर्मसंमूढचेताः ।**
**यच्छ्रेयः स्यान्निश्चितं ब्रूहि तन्मे शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम् ।। ''**

त्याचप्रमाणें स्वामीजीसुद्धां आपल्या मनांत चाललेल्या संग्रामाचा शेवट करण्यासाठीं - म्हणजेच श्रद्धा व अश्रद्धा यांच्या मनांत चाललेल्या झगड्याचा अंत करण्यासाठीं - श्रीरामकृष्णांना शरण जातात, आणि ज्याप्रमाणें श्रीकृष्णाने अर्जुनाच्या शंकानिरसनार्थ गीतेचा उपदेश केला त्याचप्रमाणे भगवान् श्रीरामकृष्णांनींही स्वामी विवेकानंदांना शिष्य म्हणून स्विकारुन त्यांना तत्त्वोपदेश केला. भगवंतानीं गीतेमध्यें अर्जुनाला प्रथम सांख्यशास्त्राचा म्हणजे तत्त्वज्ञानाचा उपदेश केला आहे. त्याचप्रमाणें श्रीरामकृष्णांनी विवेकानंदांना आत्मज्ञानाचा बोध केला आहे. श्रीरामकृष्ण जरी त्यांच्या इतर गृहस्थ शिष्यांपाशीं सगुण साकार परमेश्वराबद्दल बोलत असत व भक्तिमार्गाचा उपदेश करीत तरी स्वामी विवेकानंदांजवळ बोलतांना ते अद्वैत तत्त्वज्ञानाचा विचारच त्यांना सांगत असत. श्रीरामकृष्णांनीं स्वामीजींना सर्वांत प्रथम शिकविलेलें पुस्तक म्हणजे अष्टावक्र गीता. आणि हा अगदीं चरम अद्वैत तत्त्वज्ञानाचा ग्रंथ होय. असें सांगण्यांत येतें कीं, जेव्हां स्वामीजींनां हा ग्रंथ भगवान श्रीरामकृष्ण शिकवीत असत तेव्हां कोणी गृहस्थ भक्त आले तर ते हा ग्रंथ उशीखालीं लपवीत. त्या गृहस्थाला तो ग्रंथ सुद्धां ते दाखवीत नसत.

दुसऱ्या अध्यायांत ज्ञानाचा उपदेश ऐकून घेतल्यानंतर, तिसऱ्या अध्यायाच्या पहिल्या श्लोकांत अर्जुन श्रीकृष्णाला विचारतो, **'' ज्यायसी**

**चेत्कर्मणस्ते मता बुद्धिर्जनार्दन । तत्किं कर्मणि घोरे मां नियोजयसी केशव ।** " त्याचप्रमाणें स्वामी विवेकानंदसुद्धां, श्रीरामकृष्णांकडून तत्त्वज्ञानाचा उपदेश ऐकून घेतल्यानंतर, त्यांच्याजवळ निर्विकल्प समाधीची याचना करतात; आपण याच स्थितींत कायम राहावें आणि देहाचें आणि जगाचें भान सुद्धां विसरावें असा वर देण्याची विनंति करतात. ज्याप्रमाणें श्रीकृष्णाने अर्जुनाला कर्म करण्याचा आदेश दिला आणि म्हटलें,

**" कर्मणैव हि संसिद्धिमास्थिता जनकादयः ।**
**लोकसंग्रहमेवापि संपश्यन्कर्तुमर्हसि ।"**

त्याचप्रमाणे श्रीरामकृष्णांनीं सुद्धां स्वामीजीनां त्यांचा धिक्कार करुन म्हटलें, " मला वाटत होतें कीं, तूं एखाद्या विशाल वटवृक्षाप्रमाणें होऊन अनेक वाटसरुंनां ( साधकांना ) आश्रय देशील. परंतु तूं तर एखाद्या क्षुद्र जीवाप्रमाणें आपल्या स्वतःच्या सुखासाठीं, स्वतःच्या मुक्तीसाठीं याचना करीत आहेस. " युद्धाचें रणांगण सोडून भिक्षापात्र घेतों असें म्हणणाऱ्या अर्जुनाचा देखील श्रीकृष्णांनीं असाच धिक्कार केलेला दिसून येतो. भगवान् त्याला म्हणाले,

**" कुतस्त्वा कश्मलमिदं विषमे समुपस्थितम् ।**
**अनार्यजुष्टमस्वर्ग्यमकीर्तिकरमर्जुन ।। "**
**" क्लैब्यं मा स्म गमः पार्थ नैतत्त्वय्युपपद्यते ।**
**क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ठ परंतप ।।"**

कदाचित् अर्जुनाला युद्ध न करतां रानावनांत जाऊन तपश्चर्या केल्यास स्वतःची मुक्ति मिळवितां आली असती, परंतु श्रीकृष्णाला माहीत होतें कीं, अर्जुन हा केवळ इतर दहाजणांसारखा नसून तो आपलें अवतारकार्य साधण्यासाठीं आलेला आपलाच अंश आहे. आणि म्हणूनच त्यांनी अर्जुनाला केवळ आत्ममुक्तीचा मार्ग सोडून लोकोद्धाराच्या कार्याला वाहून घेण्यास सांगितलें. अर्जुनाच्या जागीं इतर कोणी साधारण जीव असता तर गोपींनी जशी भक्ति केली तशी भक्ति करुन, किंवा इतर ऋषिमुनींनी श्रीकृष्णाचें चिंतन करुन मुक्ति मिळविली त्याचप्रमाणें करायला त्याला भगवंतानीं मुभा दिली असती. श्रीरामकृष्णांनी सुद्धां, स्वामीजींनी त्यांच्याजवळ निर्विकल्प समाधीसाठीं प्रार्थना केली त्यावेळीं त्यांची अवहेलना केली पण त्यांच्या इतर शिष्यांना त्यांनी ती सहज देऊन टाकली.

मथुरबाबूसारख्यांना किंवा श्रीरामकृष्णांचा भाचा हृदय अशासारख्यांना सुद्धां श्रीरामकृष्णांनी असे अनेक आध्यात्मिक अनुभव आणून दिल्याचें आपण त्यांच्या चरित्रांत वाचतों. अर्जुन हा क्षत्रिय असून युद्ध करणें हा त्याचा स्वभावधर्म आहे असें असतांना देखील त्याला ज्ञान, भक्ति, कर्म, योग या सर्वांचा उपदेश केलेला दिसून येतो. त्याचप्रमाणें भगवान श्रीरामकृष्णांनी सुद्धां स्वामी विवेकानंदांना सगळ्या योगांची शिकवण देऊन जगाचें नेतृत्व घेण्याला तयार केल्याचें आपण पाहातों. गीतेंतील अर्जुन व स्वामी विवेकानंद यांमध्यें फरक एवढाच कीं, गीतेमध्यें केवळ उपदेशच आहे, तो अर्जुनाच्या जीवनांत कसा फलित झाला हें दिसून येत नाहीं, परंतु स्वामीजींच्या चरित्रांत स्वामीजींना मिळालेला उपदेश त्यांच्या जीवनांत फळाला येऊन स्वामीजी स्वतःच कसे भगवत्स्वरुप झाले हें आपण पाहूं शकतों. गीतेंत फक्त शिकवण आहे पण स्वामीजींच्या चरित्रांत त्या शिकवणींचे आचरणही दिसून येतें, आणि गीतेचें मूर्त स्वरुपांत दर्शन घडतें.

स्वामीजी हे अत्यंत श्रेष्ठ ज्ञानी होते. त्यांनी ज्ञानयोगाच्या सगळ्या पायऱ्या ओलांडल्या होत्या, हें आम्हांला त्यांच्या चरित्रावरुन दिसून येतें. कित्येकांची समजूत अशी आहे कीं, स्वामीजींना एकदांच निर्विकल्पावस्थेचा अनुभव आला होता. कारण स्वामीजींच्या चरित्रांत असा उल्लेख आहे कीं, जेव्हां त्यांना प्रथम निर्विकल्प समाधीचा अनुभव मिळाला तेव्हां श्रीरामकृष्ण त्यांना म्हणाले होते कीं, आपलें जीवितकार्य संपवीपर्यंत ही समाधि त्यांना पुन्हां लाभायची नाहीं. परंतु श्रीरामकृष्णांनी जें म्हटलें त्याचा अर्थ एवढाच कीं, स्वामीजींना निरंतर त्या अवस्थेमध्यें राहाणें शक्य होणार नाहीं. त्यांना कार्य करावेंच लागणार; लोकोद्धारासाठीं त्यांना कष्ट सोसावेच लागतील. आणि श्रीरामकृष्णांचें अवतारकार्य स्वामीजींच्या हातून पूर्ण झाल्यानंतर मात्र त्यांना शांत व अलिप्त राहतां येईल. तोपर्यंत त्यांना जगापासून अलिप्त राहतां येणार नाहीं. मेरी बर्क नांवाच्या अमेरिकन विदुषीनें, **" स्वामी विवेकानंद इन् अमेरिका, न्यू डिस्कवरीज "** या ग्रंथांत लिहिलें आहे, " अमेरिकेंतल्या पर्सी या गांवी श्री. लेगेट नांवाच्या गृहस्थाचे स्वामीजी पाहुणे होते. एके दिवशीं लेगेट साहेबांच्या माळ्याला स्वामीजी बागेंत मरुन पडलेले दिसले, भयभीत झालेल्या माळ्याने ही गोष्ट मालकाला कळविली. श्री. लेगेट व इतर दोन-तीन मंडळी ताबडतोब तिथें गेली. त्या सर्वांनी पुष्कळ

प्रयत्न केले पण व्यर्थ. सरतेशेवटीं त्या माळ्याचें म्हणणेंच खरें आहे असें त्यांना खात्रीपूर्वक वाटूं लागलें. सगळेजण दिङ्मूढ होऊन गेले. त्यानंतर ब-याच वेळानें स्वामीजींच्या शरीरांत प्राणाचीं चिन्हें दिसूं लागलीं, आणि स्वामीजी हळुहळू भानावर आले. ज्या अवस्थेंतून अगदीं थोडेचजण परतूं शकतात अशा निर्विकल्पावस्थेंत स्वामीजी होते. " असे प्रकार अमेरिकेंत असतानां कितीतरी घडले आहेत.

स्वामीजींनी निर्विकल्प समाधि अनेकवार अनुभविली होती इतकेंच नव्हे तर वेदांतांत जिला ब्रह्माकारावृत्ति म्हणतात ती वृत्ति त्यांच्यामध्यें सतत दिसून येत असे. भाषण करतेवेळीं सुद्धां ते याच अवस्थेंत असत. अमेरिकेंत असतांना घडलेली एक गोष्टः स्वामीजींचा व्याख्यानाचा तो दिवस होता. व्याख्यानाला जाण्यासाठीं ते पोषाख करीत होते. पोषाख करुन होतांच भिंतीला टांगलेल्या एका आरशासमोर स्वामीजी गेले व आरशांत पाहून व्याख्यानाला जाण्यासाठीं खोलीच्या दरवाजापर्यंत आले. पण एकाएकीं काय झालें समजत नाहीं, ते परतून पुन्हां आरशासमोर उभे राहिले. आपलें रुप आरशांत निरखून पाहून पुन्हां दरवाजाजवळ गेले. परंतु कांहीं पावलें पुढें जाऊन ते पुन्हा आरशाकडे आले व आपला चेहरा त्या आरशांत न्याहाळूं लागले. असा हा त्यांचा क्रम बराच वेळ चालला. दरवाजाजवळ जावें, पुन्हां परतावें व आरशांत आपला चेहरा निरखून पहावा. हें सर्व चाललें असतां तिथें सिस्टर ख्रिस्तीन व मिस् मॅक्लाय्ड नांवाच्या स्वामीजींच्या दोन शिष्या उभ्या होत्या. त्यांना हें पाहून आश्चर्य वाटलें. स्वामीजींसारख्या माणसाला आपल्या रुपाचा इतका मोह पडावा ना ! असा विचार त्यांच्या मनांत चमकून गेला.

इतक्यांत स्वामीजी त्यांच्या समोर जाऊन उभे राहिले. त्यांचा चेहरा लालबुंद झाला होता. नेत्रही आरक्त झाले होते. दृष्टि आणि चेहरा यांवरील भावसुद्धां विचित्र झाले होते. त्या दोघींकडे पाहून स्वामीजी म्हणाले, " पहा व्याख्यानाची वेळ तर येऊन ठेपली आहे. माझ्या मनाला शरीरभानावर आणण्यासाठीं मी त्याला सांगत आहें, ' आतां व्याख्यान करावयाचें आहे. ' आरशासमोर राहीपर्यंत मन कसेंबसें शरीरभानावर आणतां येतें. आरशाकडे पाठ फिरवितांच मन अनंतात विलीन होऊन जातें- मी विवेकानंद, मला व्याख्यान द्यावयाचें आहे, वगैरे वगैरे मी विसरुन जातों. आतां याला काय

करावें? " हें ऐकून त्या दोघी शिष्यिणींचे चेहरे लाजेने लाल झाले. आपण स्वामीजींविषयीं जे विचार मनांत आणले त्याची त्यांना लाज वाटली. यावरुन आम्हांला असें दिसून येतें कीं, स्वामीजी हे एक ब्रह्मचिंतनांत मग्न होऊन राहणारे आदर्श ज्ञानी होते. त्यांना आपलें मन बळेंच व्यावहारिक पातळीवर आणावें लागे.

गीतेंत ज्ञानाच्या उपदेशानंतर तिसऱ्या व चौथ्या अध्यायांत भगवंतांनीं अर्जुनाला निष्काम कर्माचा उपदेश केला आहे. स्वामीजींना सुद्धां श्रीरामकृष्णांनी असाच जगासाठीं कार्य करण्याचा आदेश दिलेला त्यांच्या चरित्रांत आढळून येतो. श्रीरामकृष्णांच्या महासमाधिनंतरचें स्वामीजींचें जीवन म्हणजे आमच्यासमोर ठेवलेला कर्मयोगाचा एक महान् आदर्श होय. तपस्येच्या काळांत व परिव्राजकदशेंत त्यांनी आपल्या पुढील जीवितकार्याची तयारी केली आणि अमेरिकेंतल्या सर्वधर्मपरिषदेनंतर त्यांच्या प्रत्यक्ष कार्याला सुरवात झाली; आणि हें कार्य त्यांच्या महासमाधिपर्यंत टिकलें. स्वामीजींचें निष्कामकर्म म्हणजे केवळ एखाद्या साधकाचें कर्म नव्हतें, तर तें सिद्ध पुरुषाच्या अवतारकार्यासारखें कर्म होतें, हें आम्हांला स्पष्टपणें दिसून येतें. जगांतील प्रत्येक भूतमात्रामध्यें परमेश्वर पाहून शिवज्ञानानें त्यांची सेवा करणें ही त्यांची नैसर्गिक प्रवृत्ति होऊन गेली होती. 1895 च्या जुलै महिन्याच्या 9 तारखेला त्यांनी आपल्या एका अमेरिकन मित्राला, " The Living God " या नावांची एक कविता लिहून पाठविली आहे. ती कविता वाचकांनी अवश्य वाचावी. तींत ते म्हणतातः

" Ye fools ! who neglect the living God,
And His infinite reflections with which the world is full.
While ye run after imaginary shadows,
That lead alone to fights and quarrels,
Him worship, the only visible !
Break all other idols ! "

" हे मुर्खांनो जे तुम्ही या जिवंत परमेश्वराची आणि ज्यांनीं हें जग भरलेलें आहे अशा त्याच्या अगणित प्रतिबिंबांची उपेक्षा करतां, ते तुम्ही काल्पनिक सांवल्यांच्या मागें धावत आहांत. त्यामुळें तुम्ही तुमच्यामध्यें

भांडण तंटे मात्र करीत आहांत. जो हा प्रत्यक्ष परमेश्वर ( जगांतील सर्व दृश्य भूतमात्र ) आहे त्याची पूजा करा आणि इतर सगळ्या मूर्ति फोडून टाका". स्वामीजींना प्रत्येक भूतमात्रामध्यें याप्रमाणें परमेश्वराचें दर्शन घडत असे, आणि त्यामुळेंच ते आपल्या 39 वर्षांच्या अल्प आयुष्यामध्यें एवढें मोठें कार्य करुं शकले. दुःखी कष्टी जीवांविषयींच्या त्यांच्या कळकळीचें कारण हेंच होय. असल्या कळकळीशिवाय त्यांच्या हातून एवढा मोठा कर्मयज्ञ घडलाच नसता.

गीतेंत कर्मानंतर भक्तियोगाचा विचार आला आहे. गीतेच्या 11व्या अध्यायाच्या 55व्या श्लोकांत भगवानांनी सर्वश्रेष्ठ भक्ताचें लक्षण दिलें आहेः

**'' मत्कर्मकृन्मत्परमो मद्भक्तः सङ्गवर्जितः ।**
**निर्वैरः सर्वभूतेषु यः स मामेति पाण्डव ।। "**

जो भगवंतासाठींच कर्म करतो, भगवत्चिंतनांत काळ घालवितो, भगवन्ताशिवाय दुसऱ्या कोणावरच प्रेम करीत नाहीं ( इतरांवर प्रेम करणें तें सुद्धां त्यांच्यांत प्रत्यक्ष भगवन्ताला पाहूनच ), जो निःसंग म्हणजे विरक्त आहे, जो कोणत्याही भूतमात्रांविषयीं वैरभाव ठेवीत नाहीं, तो भगवत्स्वरुप होऊन जातो, असें भगवान या श्लोकांत सांगतात. वर सांगितलेलीं सर्व लक्षणें आम्हांला स्वामी विवेकानंदांच्या चरित्रांत दिसून येतात. स्वामीजी भगवान् श्रीरामकृष्णांचा आदेश पाळण्यासाठींच आपलें सर्व जीवन जगले. त्यांच्या चरणांशिवाय किंवा त्यांच्या आदेशाव्यतिरिक्त दुसरा कोणताही विषय त्यांच्या मनाला स्पर्श करुं शकला नाहीं. श्रीरामकृष्णांविषयींचें त्यांचें प्रेम तर अद्वितीय असें होतें. श्रीरामकृष्णांच्या अखेरच्या आजाराच्या वेळची गोष्ट. श्रीरामकृष्णांचा रोग सांसर्गिक आहे असें जेव्हां डॉक्टरांनीं सांगितलें तेव्हां रामकृष्णांचे इतर शिष्य त्यांच्या सेवेंत हयगय करुं लागले. हें पाहून स्वामीजींची गुरुभक्ति दाटून आली आणि त्या आवेगाच्या भरांत त्यांनीं सर्वांसमक्ष श्रीरामकृष्णांच्या घशांतील पू, रक्त, वगैरेनीं भरलेले भांडें आपल्या घशांत ओतलें. त्यानंतर इतर शिष्य रामकृष्णांची सेवा पूर्ववत् करुं लागले. स्वामीजी तर संन्यासी होतेच. कोणत्याही प्रकारच्या संगानें ते दूषित झाले नाहींत, हें सांगण्याचा प्रयत्न करणें म्हणजे सुद्धां अयोग्य असें आम्हांला वाटतें. तसेंच, ज्यांचें सबंध जीवन केवळ दुःखी कष्टी जीवांसाठींच जगण्यांत आलें आणि ज्यांनी, या जगांतील एखाद्या कुत्र्याला सुद्धां मुक्ति

मिळत असेल तर त्याच्यासाठीं हजारों जन्म घेण्यास आपण तयार आहोंत, असें म्हटलें अशा माणसाला कोणत्याही भूतमात्राविषयीं वैरभाव असणें शक्य आहे काय? याची कल्पना तुम्हीच करा. गीतेंत पुढें सर्वश्रेष्ठ भक्त कोण हें सांगतांना भगवान् म्हणतात-

**'' मय्यावेश्य मनो ये मां नित्ययुक्ता उपासते ।**
**श्रद्ध्या परयोपेतास्ते मे युक्ततमाः मताः ।। "**

" माझ्या ( व्यक्तरुपाच्या ) ठिकाणीं मन लावून जे नित्य माझेंच चिंतन करीत असतात व जे अत्यंत श्रेष्ठ अशा श्रद्धेनें युक्त होऊन माझी ( व्यक्त रुपाची ) उपासना करतात, ते सर्वांत श्रेष्ठ योगी ( भक्त ) होत असें माझें मत आहे. " ही अत्यंत श्रेष्ठ भक्ताची जी व्याख्या भगवंतांनीं दिली आहे ती सुद्धां स्वामीजींच्या चरित्राला तंतोतंत लागूं पडते हें कोणालाही सांगणें नको. श्रीरामकृष्णांकडून दीक्षा घेतल्यानंतरच्या काळांत स्वामीजींना श्रीरामकृष्णांचें अखंड ध्यान घडत असे हें स्वामीजीनींच अनेक ठिकाणीं सांगितलें आहे आणि त्यांचें हें ध्यान उत्कट असल्यामुळेंच त्यांना श्रीरामकृष्णांच्या समाधीनंतर सुद्धां त्यांचें वरचेवर दर्शन घडत असे. या संदर्भांत स्वामीजींच्या जीवनांतल्या एका प्रसंगाचा उल्लेख करणें अस्थानीं होणार नाहीं, असें आम्हांला वाटतें. अमेरिकेंतल्या सर्वधर्मपरिषदेंत स्वामीजींना अभूतपूर्व यश आणि किर्ति मिळाल्यानंतर कित्येकांना त्यांच्याविषयीं भयंकर मत्सर वाटूं लागला. त्यांची निंदा वगैरे करुन स्वामींजींच्या कार्यामध्यें व्यत्यय आणण्याचे प्रयत्न तर त्यांनी केलेच; इतकेंच नव्हे तर यापुढेंही त्यांची मजल गेली.

एकदां अमेरिकेंतील डेट्रॉइट नांवाच्या शहरांत स्वामीजींना जेवणाचें आमंत्रण होतें. तेव्हां स्वामीजी आपल्यासमोर असलेला कॉफीचा कप घेऊन पिणार इतक्यांत त्यांना श्रीरामकृष्ण आपल्यासमोर उभे राहिलेले दिसले! श्रीरामकृष्णांनी त्यांना सांगितलें, **" ती कॉफी पिऊं नकोस. त्यांत विष घातलेलें आहे."** या प्रसंगाला उद्देशून स्वामीजींनीं आपल्या गुरुबंधूनां लिहिलें आहे, " गुरुदेव ( श्रीरामकृष्ण ) सदैव ज्या माझ्या पाठीमागें असतात, त्यां मला कोण काय करुं शकेल? " स्वामीजींनी असें सांगितलें आहे कीं, ते अमेरिकेंत असतांना श्रीरामकृष्ण कितीतरी वेळां प्रत्यक्ष त्यांच्या समोर येऊन, त्यांनी कुठें जावें, कुठें जाऊं नये वगैरे गोष्टी सांगत असत.

एका वाक्यांत सांगावयाचें झाल्यास स्वामीजींनी आपली काया, वाचा, मन, श्रीरामकृष्णांना अर्पण केलीं होतीं, आणि श्रीरामकृष्णांनी आपल्या कार्यासाठीं स्वामीजींना आपलें साधन बनविलें होतें. तेव्हां स्वामीजींच्या जीवनांतील या प्रसंगावरुन स्वामीजी भगवंताच्या व्याख्येप्रमाणें ' युक्ततम' भक्त होते हें दिसून येतें.

गीतेच्या शिकवणीचें सार भगवंतांनीं आपल्या उपदेशाच्या शेवटच्या श्लोकांत सांगितलें आहे. आणि हा श्लोक म्हणजे,

**' सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज ।'**

आणि स्वामीजींचें चरित्र म्हणजे या श्लोकावरील एक विस्तृत भाष्य आहे असें कोणालाही दिसून येईल.

स्वामीजी म्हणजे केवळ ज्ञानी, भक्त किंवा कर्मयोगी होते इतकेंच नव्हे तर भगवान् श्रीरामकृष्णांचें अवतारमार्ग करणारे त्यांचे हस्तक आणि स्वतः एक अंशावतार होते. इतर साधे संत आणि अवतार यांतील फरक त्यांच्या शक्तिविशेषामध्यें असतो. सर्वसाधारण सिद्ध पुरुष म्हणजे ज्यांनी परमेश्वरसाक्षात्कार करुन घेतला आहे व जे दुसऱ्यालाही साक्षात्काराचा मार्ग दाखवूं शकतात ते. परंतु अवतारी पुरुषांमध्यें एक विशिष्ट शक्ति असते. त्यामुळें ते इतरांना मार्गदर्शन करतात एवढेंच नव्हे तर आपल्या शक्तीच्या बळावर त्यांना ते सिद्धांच्या कोटींत सुद्धां नेऊन बसवूं शकतात. ते आपली आध्यात्मिक शक्ति इतरांमध्यें संचारित करुं शकतात व त्यामुळें इतरांच्या जीवनाला एक आध्यात्मिक वळण लावण्याचें सामर्थ्य त्यांच्यांत असतें. अशा प्रकारची शक्ति स्वामी विवेकानंदांच्या अंगांत होती.

जयपूरचे सेनापति सरदार हरसिंग यांच्या घरीं स्वामीजी अधून मधून धर्मचर्चा करण्यासाठीं जात असत. सरदार साहेबांचा मूर्तिपूजेवर अजिबात विश्वास नव्हता. एके दिवशीं राजमार्गावरुन श्रीकृष्णाच्या मूर्तीची मिरवणूक जात होती. तेव्हां स्वामीजींनी झटकन् सरदारसाहेबांना स्पर्श केला व म्हटलें, " पहा, ही पहा, भगवंताची सजीव मूर्ति. " त्या स्पर्शानें सरदारसाहेबांचा पूर्णपणें भावपलट झाला व त्यांच्या डोळ्यांतून अश्रू वाहूं लागले, आणि मंत्रमुग्ध झाल्यासारखे ते तिथेंच उभे राहिले. या अवस्थेंतून उतरतांच ते स्वामीजींना म्हणाले, " स्वामीजी जी गोष्ट नेहमी तर्क करीत राहून सुद्धां मी समजूं शकलों नाहीं त्या गोष्टीचा मला आज आपल्या

कृपास्पर्शानें सहज साक्षात्कार झाला. " अगदीं लहान वयांत सुद्धां स्वामीजींनी आपले गुरुबंधु स्वामी अभेदानंद यांच्यामध्यें कसा शक्तिसंचार केला होता हें आपणांस माहीत आहेच. त्यांच्या चरित्रांत अशा अनेक घटना आम्हांला दिसून येतात.

अवतार हे जन्मतःच विशेष शक्ति, ज्ञान आणि परोपकारबुद्धि यांनी युक्त असतात. इतर सिद्ध पुरुष हे जन्माला येतेवेळीं इतर जीवांसारखेच असतात, पण आपल्या प्रयत्नांनीं ते आध्यात्मिक शक्ति मिळवून घेतात. स्वामीजींना अवतार मानण्याचें कारण म्हणजे त्यांच्यामध्यें अगदीं लहानपणापासूनच अनेक अलौकिक गुण दिसून येत होते. त्यांची ध्याननिष्ठा ही जगावेगळीच होती. अगदीं शैशवावस्थेंत सुद्धां ध्यान करतेवेळीं स्वामीजी पूर्णपणें देहभान विसरुन जात. त्यांना त्या स्थितींतून देहभानावर आणणें कठिण होत असे. या त्यांच्या अंतर्मुखतेबरोबरच त्यांची परोपकारबुद्धीहि तेवढीच उत्कट होती! सर्वभूतहितेरत ही त्यांची जन्मापासूनची वृत्ति!

स्वामीजी सहा वर्षांचे असतानांची गोष्ट. कोणतीतरी जत्रा पाहण्यासाठीं ते एकदां आपल्या मित्रांबरोबर गेले होते. परत येतेवेळीं त्यांच्याबरोबर असलेला एक लहान मुलगा फुटपाथवरुन मुख्य रस्त्यावर गेला. त्यावेळीं पुढून भरवेगांत एक घोडागाडी येत होती. ती गाडी पाहून मुलगा भांबावून गेला. आजूबाजूचे लोकही भीतीने आरडाओरड करुं लागले. ही गडबड ऐकून स्वामीजींनी मागें पाहिलें. त्यांच्या हातांत जत्रेंत विकत घेतलेली महादेवाची एक मूर्ति होती. झटकन त्यांनी ती मूर्ति फेंकून दिली, आणि एकदम पुढें झेप घेऊन त्या मुलाला जवळजवळ घोड्याच्या टांगेखालूनच मागें खेंचलें. एका क्षणाचा विलंब लागला असता तर तो मुलगा गाडीखालीं चेंगरुन गेला असता. हें त्यांचें प्रसंगावधान, दुसऱ्याचें दुःख पाहून स्वतःला विसरण्याची वृत्ति, हें त्यांचें धैर्य आणि विलक्षण चापल्य त्यांच्या वयाच्या मुलांतच नव्हे तर तिथें जमलेल्या मोठ्या पुरुषांच्या अंगांतही दिसून आलें नाहीं. इतक्या विलक्षण अंतर्मुखतेने ध्यानमग्न होऊन बसणारे स्वामीजी, इतकी अत्यंत कार्यप्रवणता दाखवूं शकतात हें त्यांच्यामधील दैवी शक्तीमुळेंच नव्हे काय? असें म्हणतात कीं लहाणपणीं त्यांना आवरुन धरणें म्हणजे महा कठिण काम. त्यांना सांभाळण्यासाठीं दोन

दाया होत्या. पण त्यांचीही पुरेवाट होत असे. एका बाजूला ध्यानाची ओढ आणि दुसऱ्या बाजूला विलक्षण चापल्य हीं त्यांच्यामधील शिव-शक्तिसंयोगाचीं सूचक होत असें आम्हांला वाटतें. एका क्षणाला मृतवत् पडलेल्या शिवाप्रमाणें शांत व स्थिर, तर दुसऱ्या क्षणाला सृष्टि-स्थिति-लय करणाऱ्या कालीप्रमाणे दुर्दम उत्साहानें युक्त असे ते दिसत. असा हा पराकाष्ठेचा उत्साह आणि तितक्याच पराकाष्ठेची ध्यानतन्मयता हीं एकाच आधारानें राहणें म्हणजे खरोखर अत्यंत विरळ. हें केवळ परमेश्वराच्या विभूतियुक्त पुरुषांतच असणें संभवतें. आजपर्यंत जे मोठमोठे अवतार होऊन गेले त्यांच्यामध्यें आम्हांला हे गुण जन्मतःच असलेले दिसून येतात. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे अशाप्रकारचे गुण असलेल्यानांच आम्ही अवतार मानतों.

स्वामीजी जन्मतःच ज्ञानी होते हेंही आम्हांस कबूल करावें लागेल. कारण त्यांच्यामध्यें आध्यात्मिक ज्ञान असल्याशिवाय त्यांच्यात अशी ध्यानतन्मयता, परमेश्वराच्या ठिकाणीं अढळ श्रद्धा वगैरे दिसून येणें अशक्य. त्यांच्या ज्ञानावर अतिसूक्ष्म असें, सर्व शरीरधारी माणसांना असलेच पाहिजे असें, अज्ञानाचें पटल होतें. आणि रामकृष्णांच्या सहवासांत येतांच त्या पटलाचा भेद झाला.

श्रीकृष्णांनीं गीतेंत आपल्या जीवितकार्याविषयीं म्हटलें आहे,

**'' परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।**
**धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगेयुगे ।। ".**

साधूंच्या रक्षणासाठीं व दुष्टांच्या निर्दालनासाठीं, त्याचप्रमाणें जीर्णशीर्ण झालेल्या धर्माला नवचैतन्य देण्यासाठीं युगायुगामध्यें मी जन्म घेतों. याचा अर्थ असा कीं सद्‌गुणाचें रक्षण, ज्ञानाचा प्रसार वगैरे करुन धर्माला बळकटी आणण्यासाठीं परमेश्वर अवतार घेतो. हेंच त्याचें कार्य. वास्तविक परमेश्वराला स्वतःसाठीं कांहींच मिळविण्यासारखें नसतें. त्याला हवें असें जगांत कांहींच नसतें. परंतु केवळ लोकहिताची त्याला तळमळ असते. भगवान म्हणतात,

**'' न मे पार्थास्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किंचन ।**
**नानवाप्तमवाप्तव्यं वर्त एव च कर्मणि ।।"**

इतकें सांगून तो आपल्याप्रमाणेंच अर्जुनालाही कार्य करावयास

सांगतो-

**" कुरु कर्मैव तस्मात्त्वं पूर्वैः पूर्वतरं कृतम् ".**

याचप्रमाणें श्रीरामकृष्णसुद्धां स्वामीजींना आपल्या धर्मसंस्थापनेच्या व लोकोन्नतीच्या कार्याची मशाल पुढें नेण्यास सांगतात. श्रीकृष्णाने अर्जुनाला पुढें करुन गीतेचा आदेश जगाला दिला. आतां त्याच कृष्णाने श्रीरामकृष्णांचे रुप घेऊन, गीतार्थ विसरायला लागलेल्या जनतेला, ' गीताभाष्यरुप ' स्वामी विवेकानंद जगाला दिले. मनुष्यत्वांतून देवत्वाला पोंचविण्याचें गीतेचें ध्येय-म्हणजे आत्मविश्वास, धैर्य, धर्मावरील श्रद्धा, कर्तव्यतत्परता वगैरेना उजाळा देऊन माणसाचा आत्मविकास घडविण्याचें कार्य - स्वामीजींनी आपल्या जीवनाचें ध्येय बनविलें.

एकदां एका वार्ताहराने स्वामीजींना विचारलें, " स्वामीजी, पाश्चिमात्य धर्माविषयीं तुमचें काय मत आहे?" या प्रश्नाला उत्तर देतांना स्वामीजी म्हणाले, " मी ज्या तत्त्वज्ञानाचा उपदेश करीत आहें तें जगांतील सर्व धर्मांना पायाभूत होईल असें आहे. सगळ्याच धर्मांविषयीं माझी दृष्टि पूर्णपणें सहानुभूतीची आहे. माझ्या शिकवणीचा कोणत्याही धर्माला विरोध येणार नाहीं. प्रत्येक व्यक्तीचा वैयक्तिक विकास घडवून आणणें हेंच माझें ध्येय. प्रत्येक व्यक्तीने शक्तिशाली व्हावें म्हणून मी झटतों. प्रत्येक माणूस ब्रह्मस्वरुप आहे असें मी सांगतों आणि त्यानें या आपल्या ब्रह्मस्वरुपाचें ज्ञान करुन घ्यावें असें मी त्याला आग्रहपूर्वक सांगतों ".

गीता जशी केवळ अर्जुनासाठींच नव्हती त्याचप्रमाणें स्वामी विवेकानंद हे कोणताही विशिष्ट समाज किंवा देश यांसाठीं नव्हते. सर्व धर्मांसाठीं ही स्वामी विवेकानंदरुपी देणगी श्रीरामकृष्णांनी आम्हांला दिली आहे. ती देणगी आम्ही आमच्या हृदयसंपुटांत ठेवून श्रद्धापूर्वक तिची जोपासना करावी. स्वामीजी हे कोणत्याही विशिष्ट देशासाठीं किंवा गटासाठीं नव्हते हें त्यांची जन्मशताब्दि जगभर साजरी केली जाते यावरुन स्पष्ट दिसून येतें.

ज्या भारतभूमीमध्यें स्वामी विवेकानंद जन्मले तिचा जयजयकार असो. ज्या श्रीरामकृष्णांनीं आम्हांला हें रत्न दिलें त्यांचा जयजयकार असो. ज्या धर्माच्या स्थापनेसाठीं श्रीरामकृष्ण व विवेकानंद यांचा आविर्भाव झाला त्याचाही जयजयकार असो.

## संक्षिप्त राजयोग

( स्वामी विवेकानंदांच्या राजयोगावरील ग्रंथांतून उद्धृत.)

कर्मपुराणांत राजयोगाविषयींच्या केलेल्या संक्षिप्त विवेचनाचा स्वैर अनुवाद खालीं दिलेला आहे.

मनुष्याच्या भोंवती असणाऱ्या पापपंजराचें योगाग्नि भस्म करुन टाकतो. त्यामुळें त्याला चित्तशुद्धि लाभते आणि प्रत्यक्ष मोक्षाचाही लाभ होत असतो. योगाने ज्ञानलाभ होतो; आणि हें ज्ञान योग्याला त्याच्या साधनांत मदत करीत असतें. ज्या योग्यामध्यें ज्ञान व योग एकसमयावच्छेदेंकरुन राहत असतात, त्याच्यावर भगवान प्रसन्न होत असतो. दिवसांतून एकदां, दोनदां, तीनदां, किंवा नेहमी जे महायोगाचा अभ्यास करतात त्यांना प्रत्यक्ष देवताच माना. योगाचे दोन प्रकार आहेत. एक अभावयोग व दुसरा महायोग. ज्या योगांत आपला आत्मा शून्य आहे, गुणरहित आहे असें ध्यान केलें जातें त्याला अभावयोग म्हणतात. जेव्हां आपला आत्मा आनंदघन आहे, निष्कलंक आहे, भगवत्स्वरुप आहे असें चिंतन केलें जातें तेव्हां त्याला महायोग म्हणतात. या दोहोंपैकीं कोणत्याही योगाने योग्याला आत्मसाक्षात्कार होऊं शकतो. ज्या सर्वोत्कृष्ट अशा महायोगामध्यें योगी स्वतः आपण आणि हें अखिल विश्व भगवत्स्वरुप आहोंत असें पाहतों त्या महायोगाशीं इतर कोणत्याही योगांची– ज्या योगांविषयीं आपण वाचलें किंवा ऐकलें असेल अशा योगांशीं तुलना करणें देखील अयोग्य ठरेल. हा सर्व योगांमध्यें श्रेष्ठ योग होय.

यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान आणि समाधि या राजयोगाच्या आठ पायऱ्या आहेत. अहिंसा, सत्य, अस्तेय ( निर्लोभता), ब्रह्मचर्य व अपरिग्रह यांना यम म्हणतात. यांमुळें चित्तशुद्धि होते. कुणालाही कायिक, वाचिक वा मानसिक पीडा न देणें ही अहिंसा होय. अहिंसेहून श्रेष्ठ असें कोणतेहीं पुण्यकर्म नाहीं. अखिल विश्वाशीं अहिंसावृत्ति ठेवल्यामुळें जें सुख लाभतें त्याहून श्रेष्ठ असें कोणतेंही सुख नाहीं. सत्यपालनाने आपल्याला कर्मफळांचा लाभ होत असतो. सत्याने सर्वकांहीं लाभतें. सर्वकांहीं सत्यामध्येंच प्रतिष्ठित आहे. जशी वस्तुस्थिति असेल तशीच ती कथन करणें हें सत्य होय. इतरांच्या वस्तु चोरून वा बळजबरीनें न घेणें याला अस्तेय असें म्हणतात. काया, वाचा आणि मनेंकरुन सर्वदा

आणि सर्व परिस्थितींत मैथुन न करणें यास ब्रह्मचर्य म्हणतात. अत्यंत कष्टमय परिस्थिति आली असतां देखील दुसऱ्याकडून कोणत्याही वस्तूचा उपहार न स्वीकारणें याला अपरिग्रह म्हणतात. या मागील तत्त्व असें आहे कीं, जो दुसऱ्याकडून कोणत्याही वस्तूचें दान स्वीकारतो त्याचें मन मलिन होत असतें, तो हीन होतो; तो आपलें स्वातंत्र्य गमावतो; तो बद्ध होतो व आसक्त होतो.

योगांत यश मिळविण्यास पोषक अशा खालीं दिलेल्या साधनांनां नियम असें म्हणतात. नियम म्हणजे नियमितपणें चालवावे लागणारे नेम किंवा व्रतें. तप, स्वाध्याय, संतोष, शौच, ईश्वरप्रणिधान हे नियम होत. उपवासानीं वा अन्य उपायांनीं शरीरसंयम करणें यास शारीरिक तप म्हणतात.

वेदपठनानें किंवा मंत्रजपानें सत्वशुद्धि होत असते. अशा या वेदपाठाला किंवा जपाला स्वाध्याय असें म्हणतात. त्या पाठाचे किंवा जपाचे तीन प्रकार आहेत. ते म्हणजे वाचिक, उपांशु व मानस. इतरांस स्पष्ट ऐकूं जाण्याजोगा केलेला जप हा सर्वांत निकृष्ट दर्जाचा आणि ऐकूं न येणारा हा सर्वांत श्रेष्ठ. मोठ्यानें केलेला मंत्रोच्चार हा वाचिक; त्यानंतरच्या मंत्रोच्चारामध्यें केवळ ओठ मात्र हालत असतात पण शब्द ऐकूं येत नाहींत. जो जप कोणालाही ऐकूं जात नाहीं, व जो जप चालला असतां त्याच्या अर्थाचें चिंतन मनांतल्यामनांत केलें जातें त्याला मानस जप म्हणतात. हा जप सर्वांत श्रेष्ठ होय.

ऋषींच्या मतें शौचाचे दोन प्रकार आहेत- बाह्य आणि आंतर . स्नानादिकांनीं- म्हणजेच पाणी, माती व इतर द्रव्यांनीं- करण्यांत येणारी शरीराची शुद्धि हें बाह्य शौच होय. सत्य आणि इतर सद्‌गुणांच्याद्वारें करण्यांत येणारी मनाची शुद्धि हें आंतर शौच होय. हीं दोन्हीही आवश्यक आहेत. माणसानें केवळ अंतःशुद्धीच राखून बाह्यतः अशुद्ध राहिल्यानें भागणार नाहीं. जेव्हां दोन्ही प्रकारचें शौच- आभ्यंतर आणि बाह्य शौच- राखणें साध्य होत नसेल तेव्हां आंतर शौच राखणें बरें; परंतु हीं दोन्हीही प्रकारचीं शौचें असल्यावाचूंन कुणीही योगी होऊं शकणार नाहीं.

ईश्वराचें चिंतन, भजन व स्तवन करणें हें ईश्वरप्रणिधान होय.

येथपर्यंत यम व नियम यांचें विवेचन झालें. यापुढील विचार

आसनाचा. आसनाविषयीं एवढेंच लक्षांत ठेविलें म्हणजे पुरे कीं, छाती, भुजा, व शिर एकाच रेषेंत ठेवून शरीर मोकळें सोडावें. त्यानंतर प्राणायाम. प्राण म्हणजे प्रत्येक शरीरांत वास करणारी जीवनशक्ति. आयाम म्हणजे या शक्तीचा संयम. प्राणायाम तीन प्रकारचे असतात. साधा किंवा सोपा, मध्यम, आणि उत्तम किंवा श्रेष्ठ. प्राणायामाचीं तीन अंगें आहेत. पूरक ( हवा आंत घेणें), कुंभक ( हवा आंत कोंडून ठेवणें ), आणि रेचक ( हवा बाहेर टाकणें ). ज्यांत बारा सेकंद पूरक केला जातो तो कनिष्ठ दर्जाचा प्राणायाम, ज्यांत चोवीस सेकंद पूरक केला जातो तो मध्यम प्राणायाम, आणि ज्यांत छत्तीस सेकंद पूरक केला जातो तो उत्तम प्राणायाम, असें समजावें. कनिष्ठ दर्जाच्या प्राणायामामध्यें स्वेद उत्पन्न होतो. मध्यम प्राणायामामध्यें कंप सुटतो आणि उत्तम प्राणायामांत शरीर हवेंत तरंगूं लागतें व अति उत्कट आनंदाचा जणूं झोत वाहूं लागतो. गायत्री नांवाचा एक मंत्र आहे. वेदांमधील हा एक अत्यंत पवित्र असा मंत्र होय. तो असाः- ' या विश्वाचा निर्माता जो परम पुरुष त्याच्या महिम्याचें आम्ही ध्यान करतों. तो आमच्या बुद्धीला प्रकाशित करो.' या मंत्राच्या प्रारंभीं व शेवटीं ॐ हें अक्षर जोडलेलें आहे. एका प्राणायामामध्यें गायत्रीचा तीनदां जप करावा. रेचक ( श्वास बाहेर टाकणें ), पूरक ( श्वास आंत घेणें ), आणि कुंभक ( श्वास कोंडून ठेवणें ) अशा तीन भागांत प्राणायाम विभागलेला असल्याचें साऱ्या ग्रंथांत सांगितलें आहे.

आमचीं ज्ञानेंद्रियें बहिर्मुख असल्यामुळें त्यांचा बाह्य विषयांशीं संबंध येत असतो. या इंद्रियांना काबूंत ठेवण्याचा प्रयत्न करणें म्हणजेच प्रत्याहार होय. प्रत्याहार याचा अर्थ आपल्याजवळ ओढून घेणें.

हृत्पद्मावर अथवा शिरोमध्यावर चित्त स्थिर करणें यास धारणा असें म्हणतात. एकच स्थानावर, त्या स्थानाला लक्ष्य करुन, चित्त केंद्रित केलें असतां एका विशिष्ट प्रकारच्या वृत्ति मनांत उठत असतात. अन्य कोणत्याही प्रकारच्या वृत्तींकडून या वृत्ति अभिभूत होत नसतात. उलट त्या क्रमाक्रमानें बलवत्तर मात्र होत जातात. आणि त्याबरोबरच साऱ्या इतर वृत्ति क्षीण होत जाऊन अंतीं नाश पावतात. इतर वृत्ति नाश पावल्या म्हणजे त्यांच्या जागीं चित्तांत एकच वृत्ति शिल्लक राहात असते. हिलाच ध्यान असें म्हणतात. जेव्हां लक्ष्याची आवश्यकता नसते, जेव्हां सारें मन एकाच

वृत्तीमध्यें परिणत झालेलें असतें, एकाकार झालेलें असतें, तेव्हां या स्थितीला समाधि असें म्हणतात. या समाधींत मन निरालंब होऊन, म्हणजेच कोणत्याही केंद्राचा किंवा जागेचा आश्रय न करितां, राहतें; तेथें केवळ ध्येय वस्तूचा अर्थ मात्र असतो. कोणत्याही केंद्रावर मन जर बारा सेकंद स्थिर करतां आलें तर ती धारणा झाली. अशा बारा धारणा झाल्या म्हणजे ध्यान होतें व बारा ध्यानांची समाधि होत असते.

पाण्यांत किंवा वाळलेल्या पानांनीं आच्छादित अशा भूमीवर, तसेंच जेथें अग्नि असेल, जेथें वारुळें असतील, जेथें अनेक हिंस्त्र पशू असतील, जेथें कोणत्याही प्रकारचें भय असेल, जेथें चार रस्ते मिळत असतील, जेथें गलबला फार असेल, जेथें अनेक दुष्ट माणसें राहत असतील तेथें योगाभ्यास करुं नये. हा नियम विशेषतः भारतीयांसाठीं आहे. जेव्हां शरीर आळसावलेलें किंवा अस्वस्थ असेल, तसेंच ज्यावेळीं मन अत्यंत दुःखी कष्टी झालेलें असेल त्यावेळीं योगसाधना करुं नये. जेथें तुम्हांला कुणी त्रास देणार नाहीं असा गुप्त व एकांत स्थळीं जा. घाणेरड्या जागीं जाऊं नका. किंबहुना रम्य अशा जागीं जा, किंवा आपल्या घरांतील रम्य अशा जागेची किंवा आपल्या घरांतील एखाद्या सुंदर खोलीची निवड करा. साधनारंभीं सर्व प्राचीन योग्यांनां, आपल्या गुरुला व परमेश्वराला वंदन करा व मग साधनेस सुरवात करा.

ध्यान कसें करावें हें आतां सांगण्यांत येत आहे. ध्यान कशाचें करावें हें दर्शविण्यास ध्यानाचे कांहीं प्रकारही उदाहरणादाखल खालीं दिलेले आहेत. सरळ बसा आणि आपल्या नासिकाग्राकडे पहा, म्हणजे आपलें मन कसें स्थिरावतें हें आपल्याला दिसून येईल. तसेंच डोळ्यांच्या दोन्ही नाड्यांचें नियमन केल्यानें प्रतिक्रियांच्या केंद्रांवर ताबा ठेवण्याची आपली शक्ति कशी वाढत जाते व त्यामुळें मनोजय कसा साधतां येतो हें आपल्याला आढळून येईल. आतां ध्यानाचे कांहीं प्रकार सांगतों. असा विचार करा कीं तुमच्या मस्तकाच्या कांहीं इंच वर एक कमळ आहे. धर्म हा त्याचा मध्य व ज्ञान हा त्याचा देंठ. त्या कमळाच्या आठ पाकळ्या या योग्याच्या अष्टसिद्धि; पण या पाकळ्यांच्या आंतील कोश म्हणजे तीव्र वैराग्य- अर्थातच या अष्टसिद्धींविषयीं पूर्ण औदासीन्य होय. या पद्मामध्यें स्वर्णमय, सर्वशक्तिमान, स्थूल दृष्टीस अगोचर अशा पुरुषाची कल्पना करा. मग त्या

ॐ पदनिर्दिष्ठ, अवर्णनीय, तेजोमंडळ - मध्यवर्ति पुरुषाचें ध्यान करा. आणखी एका प्रकारचें ध्यान सांगितलें आहेः हृदयाकाशाच्या मध्यभागीं एक ज्योत तेवत असल्याची भावना करा. ही ज्योत म्हणजे तुमचा आत्मा ( जीवात्मा ). या ज्योतीच्या आंत दुसरी एक अत्यंत प्रकाशमय ज्योत आहे अशी कल्पना करा. ही ज्योत तुमच्या आत्म्याचाही आत्मा-परमात्मा-होय; त्याचें ध्यान करा.

ब्रह्मचर्य, अहिंसा, अत्यंत कटु शत्रूंशीही क्षमाशीलता, सत्य, परमेश्वराच्या ठिकाणीं दृढ श्रद्धा या सर्व निरनिराळ्या वृत्ति होत. या साऱ्या तुमच्यांत वसत नसल्या तरी घाबरुं नका. साधनांनीं त्या सर्व तुम्हांला लाभतील. ज्यानें सर्व विषयासक्ति, भीति व क्रोध यांचा त्याग केला आहे, जो भगवंताचा अनन्य भक्त आहे त्यालाच शरण गेलेला आहे, ज्याचें अंतःकरण शुद्ध झालें आहे, अशानें भगवंताकडून कशाचीही इच्छा केली असतां भगवान ती पुरवील; म्हणूनच ज्ञान, भक्ति व वैराग्यद्वारें त्याची आराधना करा.

" जो कुणाचाही द्वेष करीत नाहीं, जो सर्वांचा मित्र आहे, ज्याच्यांत सर्वांविषयीं कारुण्य वसत असतें, ज्याला ' आपलें ' असें कांहींच दिसत नाहीं, ज्याचा अहंभाव लोपला आहे, जो सुखांत व दुःखांत समचित्त असतो, तसाच जो क्षमाशील, सदैव संतुष्ट; योगयुक्त, आत्मसंयमी, दृढनिश्चयी व आपलें मन व बुद्धि मलाच अर्पण केलेला आहे, तो माझा भक्त मला प्रिय होय. ज्याच्याकडून इतरांना त्रास पोंचत नाहीं व इतर लोकही ज्याला उद्विग्न करुं शकत नाहींत, जो हर्ष, क्रोध, भय व चिंता यांपासून अलिप्त आहे, तो मला प्रिय होय. जो कशाचीही अपेक्षा करीत नाहीं, जो पवित्र व कर्तव्यदक्ष आहे, सुखदुःखांविषयीं जो उदासीन, जो कधींही व्यथित होत नाहीं, ज्याने साऱ्या स्वार्थपर कर्मांचा त्याग केला आहे आणि जो निंदा व स्तुति यांत समान, स्तब्ध व मननशील आहे, यदृच्छेने जें कांहीं मिळेल त्यांतच समाधान पावणारा, ज्याला घर नाहीं, सारें जगच ज्याचें घर झालें आहे, जो स्थिरमति आहे असा माझा भक्त मला प्रिय होय." ( भगवद्‌गीता ) असेच पुरुष योगी होऊं शकतात.

नारद नांवाचे एक थोर देवर्षि होऊन गेले. ज्याप्रमाणें मानवामध्यें ऋर्षि किंवा थोर योगी असतात, त्याचप्रमाणें देवामध्यें सुद्धां श्रेष्ठ योगी

असतात. नारद हे एक चांगले, अत्यंत थोर योगी होते. ते सर्वत्र संचार करीत. एके दिवशीं असेच अरण्यांतून जात असतां ध्यानमग्न स्थितींत असलेला एक मनुष्य त्यांना दिसला. त्याच्याभोंवतीं वाळव्यानीं एक भलें मोठें वारुळ बांधलेलें होतें- एवढा काल तो त्या अवस्थेंत बसून राहिलेला होता. त्याने नारदाला विचारलें, " आपण कुठें जात आहां ? " " मी वैकुंठास जात आहें", नारद उत्तरले. " मग विष्णूला विचारा कीं ते माझ्यावर कधीं कृपा करणार आहेत. मला मुक्ति कधीं मिळेल. " किंचित् पुढें गेल्यावर नारदांनां आणखी एक मनुष्य दिसला. तो उड्या मारीत, गात, नाचत होता. तो म्हणाला, " अहो मुनिवर्य, आपण कुठें चाललांत? " त्याच्या आवाजांत आणि हावभावांत एक प्रकारचा धुंदपणा दिसत होता. " मी वैकुंठास जात आहे ", नारदांनीं उत्तर दिलें. " मग भगवन्ताला विचारा मी केव्हां मुक्त होईन तें. " नारद पुढे चालूं लागले. कांही काळ लोटल्यावर फिरुन त्याचमार्गाने नारदमुनि जात होते. आपल्या अंगाभोवती वारुळ वेढलेला तो ध्यानस्थ मनुष्य तेथें त्यांना दिसला. तो नारदांना म्हणाला, " मुनिवर्य, आपण माझ्याविषयीं भगवन्ताला विचारलेंत का ? " " होय विचारले. " " भगवान काय म्हणाले ? " " आणखी चार जन्मांनीं तुला मुक्ति मिळेल असे भगवान मला म्हणाले. " हें ऐकून तो माणूस आक्रंदू लागला आणि नारदांस म्हणाला, हें वारुळ माझ्या अंगावर वाढूपर्यंत मी ध्यान करीत बसलों, तरीपण मला आणखी चार जन्म घ्यावे लागतील ? " नारद मग दुसऱ्या माणसाकडे गेले. " माझा प्रश्न भगवन्ताला विचारलात का ? " त्या माणसाने पृच्छा केली. " होय विचारला, हें चिंचेचें झाड दिसतें ना ! या झाडाला जेवढीं पानें दिसतात तेवढे जन्म तुला घ्यावे लागतील आणि मग तुला मुक्ति मिळेल, असें भगवन्तानीं तुला सांगायला मला सांगितलें", नारद म्हणाले. हें ऐकून तो मनुष्य आनंदानें नाचूं लागला व म्हणाला, " एवढ्या अल्प काळांतच मला मुक्ति मिळेल ! " इतक्यांत आकाशवाणी झाली, " मुला, याच क्षणीं तूं मुक्त होशील". हें त्याच्या चिकाटीचें फळ होय. एवढे जन्म साधना करण्याची त्याची तयारी होती. त्याचें धैर्य खचलें नाहीं. परंतु आदल्या माणसाला अवघे चार जन्म देखील फार वाटले. युगानुयुगें वाट पहाण्यास तयार असलेल्या त्या माणसासारखी ज्याच्याठायीं चिकाटी असते त्यालाच सर्वोच्च फळ मिळूं शकतें.

## कर्मयोगाचा आदर्श

विभिन्न पंथांचें मार्गक्रमण करीत असतां देखील आपण एकाच ध्येयाप्रत पोहोचूं शकतों ही वेदान्ताची एक अतिभव्य कल्पना होय; सामान्यतः हे पंथ चतुर्विध आहेत असें मी मानतों- कर्माचा, भक्तीचा, मानसशास्त्राचा व विवेकाचा किंवा ज्ञानाचा. परंतु त्याचबरोबर हेंही आपण लक्षांत ठेवलें पाहिजे कीं हे मार्ग परस्परांहून अत्यंत भिन्न वा विसदृश नाहींत. ते जणूं एकमेकांत मिसळलेले - अंतर्भूत झालेले - आहेत. परंतु ( कर्म, भक्ति इत्यादिपैकीं ) ज्या गुणाचा प्रभाव अधिक त्याला अनुलक्षून आपण यांचे विभाग करितों; शिवाय असें नाहीं कीं कर्मप्रवणतेवांचून इतर कोणतेच गुण आपल्या अंगीं नसलेले लोक आम्हांस आढळतील, किंवा केवळ भक्तिभावाने पूजा करण्यांवांचून ज्यांना अन्य कांहींच करितां येत नाहीं असे मनुष्य आपल्यास सांपडतील, वा केवळ विवेकबुद्धीवांचून ज्यांच्यामध्यें दुसरें कांहींच नसतें अशीं माणसें असूं शकतील. ज्या मनुष्यांत जी प्रवृत्ति प्रबल असेल तिला अनुलक्षून या मार्गांस निरनिराळीं नांवें देण्यांत आलेलीं आहेत. आपण हें पाहिलेंच आहे कीं, ह्या चारही मार्गांचें शेवटीं एकाच ठिकाणीं केंद्रीकरण होत असतें. साऱ्या धर्मांचें व कर्म आणि साधनापद्धतींचें लक्ष्य एकच असतें.

याअगोदरच आपलें अंतिम लक्ष्य कोणतें हें दाखविण्याचा मी यत्न केला आहे. माझ्या मतें तें ध्येय म्हणजे पूर्ण स्वातंत्र्य हेंच होय. आपल्याभोंवतीं दिसणारें सारें कांहीं अणूपासून मनुष्यापर्यंत- अचेतन जड अशा क्षुद्र भौतिक परमाणूपासून भूतलावरील सर्वोच्च अशा स्थितींतील मानवात्म्यापर्यंत - त्या एकाच ध्येयाप्रत जाण्याची धडपड करीत असतें. वस्तुतः हें अखिल विश्व त्या मुक्तीसाठीं- स्वातंत्र्यासाठीं-करण्यांत येणाऱ्या परिश्रमाचेंच दृश्य फळ होय. अनेक द्रव्यांच्या संयोगापासून उत्पन्न झालेल्या कोणत्याही पदार्थांतील प्रत्येक परमाणू इतर परमाणूंपासून आपापल्या मार्गाने दूर जाण्याचा प्रयत्न करीत असतो. आणि इतर परमाणू त्याला रोखूं पाहात असतात. आपली पृथ्वी सूर्यापासून दूर जाण्याचा प्रयत्न करीत असते तर चंद्र पृथ्वी पासून पळण्याचा यत्न करीत असतो. प्रत्येक वस्तूचा अविरतपणें असा फांकण्याकडे, अन्य वस्तूपासून दूर जाण्याकडेच, कल असतो. या विश्वांत जें जें कांहीं दिसतें त्या सर्वांच्या बुडाशीं स्वातंत्र्याप्रीत्यर्थ

करण्यांत येणारी धडपड हेंच खरें मुख्य तत्त्व आहे. याच एका भावनेने प्रेरित होऊन संत प्रार्थना करीत असतो आणि दरोडेखोर दरोडे घालीत असतो. ही भावना जेव्हां योग्यप्रकारें कार्योन्मुख होत नसते तेव्हां आपण तें ' अशुभ ' म्हणतों व तीच भावना योग्य किंवा उदात्त कार्यांच्याद्वारा प्रकट होते तेव्हां आम्ही तें ' शुभ ' असें म्हणतों. एवींतेवीं, प्रेरणा एकच स्वातंत्र्यासाठीं तळमळ. संत आपल्या संसारबंधाच्या जाणीवेने व्याकूळ झालेला असतो; ते बंध त्याला तोडायचे असतात. म्हणून तो परमेश्वराची आराधना करतो. आपल्याला इष्ट असणाऱ्या वस्तूच्या अभावाच्या कल्पनेने चोर पीडिलेला असतो आणि आपल्या गरजा भागविण्यासाठीं, त्यांच्यापासून आपली सुटका करुन घेण्यासाठीं, त्याची धडपड असते; म्हणून तो चोरी करतो. चेतन व अचेतन, अखिल प्रकृतीचें स्वातंत्र्य हेंच एकमेव लक्ष्य होय; आणि सर्व कांहीं या लक्ष्याप्रतच वाटचाल करीत आहे. संताला हवी असणारी मुक्ति आणि दरोडेखोराला हवें असणारें स्वातंत्र्य यांमध्यें अर्थातच फार मोठें अंतर आहे. संताचें मुक्तीवरील प्रेम त्याला असीमाची, अनिर्वचनीय आनंदाची प्राप्ति करुन देत असतें तर चोराचें स्वातंत्र्यप्रेम त्याच्या जीवात्म्यावर इतर बंध जखडीत असतें.

या मुक्ति ( स्वातंत्र्य, लाभासाठीं करण्यांत येणाऱ्या प्रयत्नांचा आविष्कार आम्हांला प्रत्येक धर्मांत दिसून येईल. हा प्रयत्नच साऱ्या नीतीचा, निःस्वार्थतेचा - म्हणजेच आपण हा क्षुद्र देह आहोंत या कल्पनेच्या त्यागाचा - पाया होय. जेव्हां एखादा मनुष्य एखादें सत्कर्म करीत असतो, कुणास मदत करीत असतो, तेव्हां तो वस्तुतः " मी आणि माझें " च्या संकुचित कक्षेंतून निसटण्याचा प्रयत्न करीत असतो. या निःस्वार्थ होण्याच्या प्रयत्नांस कोणतीही सीमा असूं शकत नाहीं- एवढे प्रयत्न केले म्हणजे पुरे आणखी नकोत, असें म्हणवत नाहीं. सर्व नीतिशास्त्रांनी संपूर्ण निःस्वार्थतेचेंच ध्येय आमच्यापुढें ठेवलेलें आहे. समजा एखादा मनुष्य पूर्णपणें निःस्वार्थ होऊं शकला तर त्याचें काय होईल? मग तो एक केवळ कुणीतरी क्षुल्लक व्यक्ति राहणार नाहीं- त्याला अत्यंत व्यापक स्वरुप प्राप्त होईल. त्याचें अगोदरचें सीमित व्यक्तित्व आतां कायमचेंच ओसरेल; त्याला अनंतत्वाची प्राप्ति होईल. या अनंतत्वाची प्राप्ति हेंच सर्व धर्मांचें आणि नैतिक व तात्त्विक शिकवणीचें ध्येय होय. परंतु हीच कल्पना तत्त्वज्ञान

म्हणून मांडली गेली असतां व्यक्तित्ववादी ( Personalist ) मनुष्य बिचकतो. तरीपण जेव्हां तो स्वतः नीतितत्त्वें उपदेशीत असतो तेव्हां तो सुद्धां याच सिद्धान्ताचा प्रचार करीत असतो. मनुष्याने कोठवर निःस्वार्थ असावें याचीही तो मर्यादा घालीत नाहीं. समजा व्यक्तित्ववाद्यांच्या पद्धतीनुसार एखादा मनुष्य पूर्णपणें निःस्वार्थ होतो. मग सांगा त्याच्यांत आणि इतर पूर्णत्वास पोंचलेल्या सिद्धांत काय फरक राहणार ? तो अखिल विश्वाशीं एकरुप झालेला असतो. आणि हेंच तर साऱ्याजणांचें ध्येय असतें. एवढेंच कीं, त्या बिचाऱ्या व्यक्तित्ववाद्याला आपणच अंगीकारलेल्या या विचारसरणीला शेवटपर्यंत चिकटून राहून तिचा अंतिम सिद्धांत गांठण्याचें धैर्य नसतें. सर्व मानवजातीचें अंतिम ध्येय जी मुक्ति, तीच निष्काम कर्माच्या द्वारें मिळविणें, हें कर्मयोगाचें लक्ष्य होय आमच्या ध्येयप्राप्तीच्या मार्गात प्रत्येक स्वार्थपर कर्म अडथळे आणीत असतें, आणि निःस्वार्थ कर्म आम्हांला मदत करीत असतें. म्हणूनच तर नीतीची व्याख्या केवळ अशीच करतां येईल कीं, स्वार्थपरता हीच अनीति, निःस्वार्थतता हीच नीति.

परंतु आपण एखाद्या विशिष्ट परिस्थितीचा विचार करीत असतां कोणती गोष्ट नीतिसंगत आणि कोणती नीतिबाह्य हें ठरविणें आम्हांला तितकें सोपें जाणार नाहीं. उदाहरणार्थ, परिस्थितीनुसार कर्तव्याकर्तव्यतेच्या कल्पनाही बदलत असतात, हें मागें मी सांगितलेंच आहे. एकच कर्म एका परिस्थितींत निःस्वार्थ तर दुसऱ्या प्रकारच्या परिस्थितींत अत्यंत स्वार्थपर होऊं शकतें.

अतएव आपण नीतीची ( कर्तव्याची ) केवळ एक सर्वसामान्य व्याख्या देऊं शकतों. कोणत्याही विशिष्ट संदर्भात नीतिपर कोणतें व अनीतिपर कोणतें हें ठरविण्यास आपण देश, काल व परिस्थिति यांचा विचार केला पाहिजे. एका देशांत एका प्रकारचें वर्तन नीतिस धरुन आहे असें मानलें जातें तर दुसऱ्या एखाद्या देशांत तेंच वर्तन नीतिविरुद्ध ठरतें- हें केवळ परिस्थितींतील भेदामुळें. साऱ्या प्रकृतीचें अंतिम साध्य स्वातंत्र्य हेंच आहे; आणि हें स्वातंत्र्य पूर्णपणें निःस्वार्थ झाल्यानेंच मिळूं शकेल. निःस्वार्थपणें केलेला प्रत्येक विचार, उच्चार आणि आचार आम्हांला आमच्या या लक्ष्याप्रत नेत असतो, आणि म्हणूनच तो नीतिपर मानण्यांत येतो. नीतीची ही प्रस्तुत व्याख्या प्रत्येक धर्ममतास किंवा नीतिशास्त्रास ग्राह्य

असल्याचें तुम्हांस दिसून येईल. कांहींच्या मतें नीतिशास्त्र हें अपौरुष म्हणजेच ईश्वरप्रणीत आहे. तुम्ही जर त्यांना विचाराल ' माणसाने असेंच कां वागावें, अन्य रीतीने कां नये वागूं?' तर तुम्हांला त्यांचें उत्तर मिळेल, ' ईश्वरी आज्ञाच तशी आहे म्हणून. ' या नीतिशास्त्राचा उगम कोणताही असो, एवढें मात्र खरें कीं साऱ्या नीतिशास्त्रांची मध्यवर्ति कल्पना एकच- स्वतःविषयींचा विचार करायचा नाहीं; साऱ्या मीपणाचा आणि ममत्वाचा त्याग करावयाचा. नीतिविषयींची कल्पना एवढी भव्य असूनदेखील कांहींजणांना आपल्या क्षुद्र, सीमित व्यक्तित्वाचा त्याग करण्याची भीती वाटत असते. जो पूर्णपणें निःस्वार्थ झालेला आहे, जो स्वतःविषयीं मुळींच विचार करीत नाहीं, जो स्वतःसाठीं कोणतेंच कर्म करीत नाहीं, एखादा शब्द देखील उच्चारीत नाहीं, अशा माणसाविषयीं, जे आपल्या क्षुद्र सीमित व्यक्तित्वाला चिकटून राहतात त्यांनीं विचार करावा व मग आपलें ' व्यक्तित्व ' आपलें ' स्वत्व' कोठें आहे तें सांगावें. एखाद्याचें ' स्वत्व ' किंवा ' व्यक्तित्व ' तोंवरच टिकेल कीं जोंवर तो स्वतःविषयींचाच विचार करील, स्वतःसाठींच कर्म करील किंवा बोलत असेल. जर, तो इतरांचाच, विश्वाचाच, अखिल मानवतेचाच विचार करीत असेल तर त्याचे ' स्वत्त्व ' कुठे राहील ? ते कायमचेंच लुप्त नाही का होणार ?

म्हणूनच कर्मयोग हे निःस्वार्थतेच्या व सत्कर्माच्या द्वारें मुक्तिलाभ करुन देणारें नीतिशास्त्र किंवा धर्मशास्त्र आहे. कर्मयोग्याने कोणतीही विशिष्ट तत्त्वप्रणाली अंगीकारली पाहीजे असें नाहीं. कदाचित् त्याचा ईश्वरावर विश्वास नसला तरी चालेल. आत्म्याच्या स्वरुपाविषयीं किंवा तत्त्वज्ञानाचे कूट प्रश्न घेऊन त्याचें मंथन त्याने नको करीत बसायला. ही स्वार्थशून्यता साधायचा त्याचा खास स्वतःचाच असा मार्ग आहे; आणि हा मार्ग त्यानें स्वतःच आक्रमिला पाहिजे. जें साध्य गांठण्यासाठीं ज्ञानमार्गाने जाणारा विवेकाचा व आपल्या स्फूर्तीचा आश्रय घेतो, भक्त ईश्वरानुरागाचा अवलंब करितो, तेंच साध्य त्याला कोणत्याही सिद्धांताचा वा विशिष्ट धर्मतत्त्वांचा अंगीकार न करतां केवळ कर्मांच्या द्वारेंच गांठावयाचें असतें. आणि म्हणूनच त्याच्या जीवनांतील प्रत्येक क्षण त्याला आत्मानुभूतीकडे नेणारा असावा लागतो.

आतां दुसरा प्रश्न असाः कर्मयोग्याचें हें कर्म तरी कोणतें? जगाचें

कल्याण करावयाचें म्हणजे काय? आम्ही जगाचें हित साधूं शकूं का ? परमार्थतः, नाहीं; पण व्यावहारिक दृष्ट्या, होय. म्हणजे आम्ही जगाचें शाश्वत वा कायमचें असें हित करुं शकणार नाहीं. तसें जर करतां आलें असतें तर हें जग असें राहिलेंच नसतें. आम्ही एखाद्याची भूक पांच मिनिटांसाठीं भागवूं शकूं पण फिरुन त्याला भूक लागणारच. जें जें सुख आम्ही एखाद्याला देत असतों तें तें केवळ क्षणिकच असल्याचें आम्हांला दिसून येतें. कोणीही कुणाच्याही या फिरुन फिरुन येणाऱ्या सुखदुःखरुपी ज्वरावर कायमचाच इलाज योजूं शकणार नाहीं. जगाला शाश्वत सुख कोणी देऊं शकेल का? समुद्राच्या पृष्ठभागावर कुठेंतरी लाट उठवावयाची म्हणजे दुसऱ्या कुठेंतरी खळगा पाडल्यावांचून तें शक्य आहे का ? जगांतील साऱ्या इष्ट वस्तूंची आपण गोळाबेरीज केली आणि त्या विषयींची मनुष्याची गरज वा आशा पाहिली तर त्या दोहोंमधील प्रमाण नेहमी एकच राहिल्याचें आम्हांला दिसून येईल. तें कधींच बदलतां, कमी वा अधिक करतां, येत नाहीं. आज आम्हांला ज्ञात असलेला मानवी जीवनाचा इतिहासच पाहा ना. तींच सुखें, तींच दुःखें, त्याच यातना, तेच भोग आणि तेच उच्चनीचतेचे भेद नाहींत का आपल्याला दिसत? कांहीं श्रीमंत कांहीं गरीब, कांहीं उच्च कांहीं नीच, कांहीं निरोगी कांहीं रोगी, असेंच ना? अत्यंत प्राचीन काळच्या इजिप्शियन, ग्रीक व रोमन यांच्या बाबतींतही असेंच होतें आणि आजच्या तुम्हां अमेरिकनांच्या बाबतींतही तेंच. आम्हांला जेवढा इतिहास ज्ञात आहे त्यावरुन तरी दिसतें कीं हें सर्वदा असेंच चालायचें. त्याचबरोबर आम्हांला असेंही आढळून येतें कीं या सुखदुःखांच्या अनिवार्य विषमतेबरोबरच तिच्या निवारणार्थ प्रयत्नही तसेच चालू आहेत. इतरांचा मार्ग सोपा करण्यासाठीं ज्यांनी स्वतः खस्ता खाल्ल्या असे हजारों स्त्रीपुरुष इतिहासाच्या प्रत्येक कालखंडांत उत्पन्न झालेले आहेत. आणि त्यांना कोठवर यश आलें? जणूं एकीकडून दुसरीकडे चेंडू न्यायचा असा हा आमचा खेळ आहे. शारीरिक व्यथा आम्ही कमी करतों, आणि मग मानसिक व्यथा उद्‌भवतात. नरकाचें वर्णन करीत असतां डान्टेने आपल्या कवितेंत कृपणांची एक गोष्ट सांगितली आहे. एकदां म्हणे कांहीं कृपणांना एक भला मोठा सोन्याचा गोळा एका टेकडीवर चढवायचा होता. ते किंचित् तो वर चढवीत आणि दर वेळीं तो गडगडत खालीं येई. आमचेंही तसेंच आहे. जगावरील केवळ सुखाच्या

काळाच्या आमच्या कल्पना फक्त शाळकरी मुलांना सांगण्याच्याच योग्यतेच्या आहेत - त्याहून अधिक योग्यतेच्या नाहींत. अशा या सार्वजनीन निर्भेळ सुखाच्या काळाच्या कल्पनेंत रमणारीं सारीं राष्ट्रें असेंही मानतात कीं जगांतील इतर कोणत्याही लोकांपेक्षां त्यांनाच अधिक सुख मिळेल. त्यांची सार्वलौकिक सुखाविषयींची किती निःस्वार्थ कल्पना ही !

आपण जगांतील सुखांत यत्किंचित् भर घालूं शकत नाहीं, तसेंच जगाला अधिक दुःखीही करुं शकत नाहीं. या जगांत दिसून येणाऱ्या सुखदुःखांची एकूण शक्ति सदैव तेवढीच राहाणार. केवळ आम्ही तिला एकीकडून दुसरीकडे ढकलीत असतों. तिच्यांत बदल, कांहीं अधिक उणें, करुं शकत नाहीं; ती तशीच राहाणार. आणि तसें राहणे हा तिचा स्वभावच आहे. ही भरती ओहोटी, उन्नति अवनति, तिचा स्वभावधर्मच आहे. हें मान्य न करणें म्हणजे मृत्युहीन जीवन असूं शकेल असें म्हणण्यासारखेंच आहे. आणि असें म्हणणें ही केवळ अर्थशून्य बडबड आहे. कारण जीवनाच्या कल्पनेंत मरणाची कल्पना अभिप्रेत असतेच. आणि सुखाच्या कल्पनेंत दुःखही गर्भित असतें. दिवा स्वतःला सतत जाळीत असतो आणि हेंच त्याचें जगणें तुम्हांला जगायचें असेल तर त्यासाठीं तुम्हांस प्रतिक्षणीं मरावें लागेल. जन्म आणि मृत्यु हीं दोन्ही एकाच गोष्टीचीं भिन्न दृष्टिकोनांतून दिसणारीं भिन्न रुपें आहेत. जणूं काय एकाच लाटेंतील वर उसळणारें आणि खालीं पडणारें पाणी. एकजण लाटेच्या खालीं कोसळणाऱ्या भागाकडे पाहातो व निराशावादी बनतो तर दुसरा तिच्याच वर उसळणाऱ्या कमानीकडे पाहून आशावादी होतो. जेव्हां मुलगा शाळेंत जात असतो आणि त्याचे आईवडील त्याची काळजी घेत असतात, तेव्हां त्याला सर्व काहीं ठीक चाललें आहे असें वाटतें. त्याच्या गरजा साध्या असतात; तो थोर आशावादी असतो. परंतु एखादा वयस्क मनुष्य, त्याच्या विविध अनुभवांमुळें, कांहींसा शांत झालेला असतो, आणि त्याचा उत्साह बराच ओसरलेला असतो. त्याचप्रमाणें ज्यांच्याभोंवतीं ऱ्हासाचीं चिन्हें दिसत आहेत अशीं राष्ट्रें नवोदित राष्ट्रांहून कमी आशावादी झालीं तर तें साहजिकच आहे. भारतांत एक म्हण आहे, ' हजार वर्षें पत्तन आणि तितकाच काळ कानन. ' शहराचें अरण्य आणि अरण्याचें शहर असें हें सर्वत्र चाललेलेंच आहे. यांपैकीं ज्या दृश्याकडे पाहावें त्याच्यावर मनुष्यांचें आशावादित्व किंवा निराशावादित्व अवलंबून

असतें.

आतां आपण समानत्वाच्या कल्पनेकडे वळूं. या सार्वजनीन सुखाच्या काळाच्या कल्पनेंत मोठी कर्मोत्तेजक शक्ति असते हें खरें. बरेचसे संप्रदाय या कल्पनेला आपापल्या धर्माचें एक अंगच समजून तिचा पुरस्कार करीत असतात. परमेश्वर स्वतः या जगांत राज्य चालवायला येईल, मग येथें सर्वांची समान परिस्थिति राहील, तींत कोणत्याही प्रकारची विषमता राहणार नाहीं असें त्यांचें सांगणें आहे. अशा मताचा प्रसार करणारे हे लोक केवळ धर्मवेडे आहेत. जगांतील इतर लोकांपेक्षां या धर्मवेड्यांमध्यें विशेष कळकळ दिसून येते हेंही तेवढेंच खरें. या धर्मवेडेपणाची मोहिनी घालूनच ख्रिस्तधर्माचा प्रसार करण्यांत आला आणि त्यामुळेंच ग्रीक व रोमन गुलामांना तो एवढा आकर्षक वाटला. त्यांना वाटूं लागलें कीं अशा या सार्वजनीन सुख मिळवून देणाऱ्या धर्माच्या छत्राखालीं आश्रय घेतल्याने पुनश्च गुलामगिरी म्हणून राहणार नाहीं, खाण्यापिण्याची रेलचेल असेल, याच भावनेने ते ख्रिस्तधर्माच्या पताकेखालीं एकत्रित झाले. ज्यांनी प्रथम या कल्पनेचा प्रचार केला ते धर्मवेडाने अंध झालेले होते खरे पण त्यांच्याठिकाणीं तीव्र कळकळ होती. आजकाल याच ' सार्वजनीन सुखाच्या ' कल्पनेला सर्वांमधील सारखेपणाचें- सर्वांना स्वातंत्र्य, सर्वांच्या ठिकाणीं बंधुभाव यांचें - रुप प्राप्त झालें आहे. हा देखील धर्मवेडेपणाचाच एक सिद्धांत आहे. सर्वांमधील खरीखुरी समानता या जगांत कधींच अस्तित्वांत आली नाहीं, आणि यापुढेंही कधीं ती येणें संभवनीय नाहीं. आम्ही सारे समान होणें शक्य तरी आहे काय? ही अशक्यकोटींतील समानता शक्य होईल, आम्हा सर्वांच्या मृत्युनंतरच. आज जें जग आम्हांस दिसतें त्यास कारण काय ? साम्यावस्थेतील बिघाड हेंच. प्रकृतीच्या आद्य स्थितींत - जिला आपण प्रलयावस्था म्हणतों तींत - मात्र पूर्णपणें समानता असते. मग ज्या भिन्न भिन्न शक्तींच्याद्वारे जगाची उत्पत्ति होते, त्या येतात तरी कशा ? धडपड, चढाओढ, संघर्ष यांपासूनच. समजा या जगतांतील सारे परमाणू साम्यावस्थेंतच राहिले असते तर मग सृष्टिक्रम तरी संभवता का ? विज्ञान आम्हांला सांगतें कीं, ते शक्य नाहीं. शांत स्थिर अशा पाण्याच्या पृष्ठभागावर थोडी हालचाल निर्माण करा, तुम्हांला मग असे दिसेल - पाण्याचा प्रत्येक कण पुनश्च शांत, स्थिर होऊ पाहात आहे - एक

दुसऱ्याच्या विरुद्ध दिशेनें येत आहे. त्याचप्रमाणें ज्याला आपण विश्व म्हणतों, त्यातील प्रत्येक पदार्थ पूर्ण साम्यावस्थेकडे जाण्यासच धडपडत असतो पुनश्च साम्यावस्थेंतून विषमता येत असते - जगाचें साम्यावस्थेकडे जाणें म्हणजे त्यातील पदार्थांचे विघटन होणे होय. या विघटनातूनच पुनः संघटन व त्यामुळें सृष्टि उत्पन्न होते. विषमता हीच मुळीं सृष्टीच्या निर्मितीस आधार आहे. तसेच सृष्टीच्या उत्पत्तीस विघटनात्मक शक्तीची जेवढी आवश्यकता आहे तेवढीच तिला संघटनशक्तीचीही जरुरी आहे.

संपूर्ण साम्यावस्था, जींत सर्व वैश्विक शक्तींची सर्व अवस्थांमध्यें समानता राहील अशी स्थिति, जगांत कधीं येणेंच संभवनीय नाहीं. अशी स्थिति तुम्हांला प्राप्त व्हावयाच्या अगोदरच हें जग कुणाही प्राण्यास राहण्यास अयोग्य होईल, आणि जगांत कुणी उरणारही नाहीं. म्हणून आम्हांला यावरुन असें दिसून येईल कीं या सर्व सार्वजनीन सुखाच्या व सर्वांमधील समानतेच्या काळाच्या कल्पना केवळ अशक्य आहेत. एवढेंच नव्हे तर त्या कल्पना प्रत्यक्षांत आणावयाचा आम्ही प्रयत्न करणें म्हणजे आपल्या अटळ नाशासच आवाहन करणें होय. माणसांमाणसांत फरक कां दिसतो ? तो त्यांच्या बौद्धिक विकासांतील न्यूनाधिक्यामुळें किंवा भेदांमुळे. निदान आजकाल तरी, तो वेडा असल्यावांचून, कुणीही असें म्हणणार नाहीं की साऱ्यांची मति सारखीच आहे. जगांत येताना आपण भिन्न स्वभाव व असमान गुणधर्म घेऊनच येत असतों; जन्मतःच कांहीं माणसें साधारण तर कांहीं असाधारण असतात. कोणत्या परिस्थितींत आम्ही जन्म घ्यावयाचा हें अगोदरच ठरलेलें असतें- आणि ही परिस्थिति टाळणेंही सर्वथैव अशक्य असतें. या देशांतील हे रेड इंडियन येथें हजारों वर्षे आहेत; पण तुमचे चारदोन पूर्वज या देशांत आले आणि त्यांनी त्याचें स्वरुप पार बदलून टाकलें. जर सर्वच समान असते तर त्या इंडियन लोकांनीं कां नाहीं प्रगति केली ? कां नाहीं शहरें बसविलीं ? या देशांत येतांना तुमचे पूर्वज निराळ्या तऱ्हेची ज्ञानशक्ति, निराळ्या प्रकारचे पूर्वसंस्कार घेऊन आले, आणि हें त्यांचें ज्ञान व त्यांचे संस्कारच आज येथें आविर्भूत झालेले आहेत. विषमतेचा पूर्ण अभाव म्हणजे संपूर्ण नाशच. जोंवर सृष्टि आहे तोंवर विषमता ही असावयाचीच, आणि ती असलीच पाहिजे. केवळ प्रलयावस्थेंतच, जेव्हां या संसारचक्राची गति खुंटेल तेव्हांच, सर्वांस सुखाचा आणि पूर्ण समतेचा काळ

येऊं शकेल. त्यापूर्वी समता अशक्य. तरीपण ही वैश्विक सुखाची, सर्वांमधील समतेची कल्पना आपणास कार्योन्मुख करते, चेतना देते, हें खरें. या सृष्टीच्या सृजनकार्याला ज्याप्रमाणें विषमतेची आवश्यकता असते तशीच त्या सृजनकार्यावर आळा घालण्यासाठीं कांहीं प्रयत्नांचीही जरुरी असते. या सृजनकार्याला आळा घालण्याचा प्रयत्न म्हणजेच मुक्तिलाभासाठीं, स्वातंत्र्यासाठीं, चालणारी धडपड. या मुक्तीसाठीं परमेश्वरप्राप्तीसाठीं करण्यांत येणाऱ्या खटपटीच्या अभावीं ही सृष्टिही टिकून राहाणार नाहीं. याप्रमाणें, बंधनास कारण होणारी एक आणि मुक्ति साधणारी दुसरी, अशा या ज्या दोन शक्ति आहेत, त्यांच्यावरच मनुष्याची जगाकडे पाहाण्याची दृष्टि आणि त्याचे कार्य करण्याचे हेतु अवलंबून असतात. हे दोन प्रकारचे हेतुच- बंधांत पाडणारे आणि मुक्ति साधणारे- आम्हांस सदैव कर्मामध्यें प्रवृत्त करीत असतात.

एकामध्यें दुसरें चक्र असणारें असें हें जगद् यंत्र फार मोठें भयानक आहे. त्याच्यांत जर आपण हात घालूं, तर त्यांत सांपडतांक्षणींच आमची इतिश्री झाली असें समजा. आम्हां सर्वांनाच वाटतें कीं, आम्ही कोणत्याही एखाद्या कर्तव्यांतून पार पडलों कीं आमची सुटका होईल मग आम्हांला निवांतपणें राहतां येईल. परंतु एका अंशानेंही ते काम आम्ही पुरे करतों न करतों तोंच दुसरें आमच्यासमोर दत्त म्हणून उभें होतें. हें प्रचंड व गुंतागुंतीचें जगद्यंत्र आम्हां सर्वांनाच खेंचून फरफटीत नेत असतें. यांतून सुटका करुन घ्यायला दोन मार्ग. एक म्हणजे त्याच्याशीं आपल्याला कांहींच कर्तव्य नाहीं असें मानून त्याचा सर्व संबंध टाकून आपण बाजूला व्हायचा, म्हणजेच साऱ्या वासनांचा व इच्छांचा त्याग करावयाचा. हें सारें सांगणें फार सोपें, पण कृतींत आणणें जवळजवळ अशक्य. दोन कोटी लोकांमध्यें एकाला तरी हें साध्य होईल की काय याची देखील मला शंकाच आहे. दुसरा मार्ग म्हणजे या संसारांतच बुडी मारायची आणि कर्माचें रहस्य उकलून घ्यावयाचें. या मार्गालाच कर्मयोग असें म्हणतात. या संसारचक्रापासून पळून नका जाऊं; त्याच्यांतच राहा आणि कर्माचें रहस्य जाणून घ्या. त्याच्यामध्यें राहूनच योग्यप्रकारें कर्म केल्यास त्यांतून आपली सुटका करुन घेणें शक्य होत असतें. या यंत्राच्या सहाय्यानेच या जगद् यंत्रांतून, निसटण्याचा मार्ग आहे.

कर्म म्हणजे काय तें आतां आम्ही पाहिलें. हें सृष्टिच्या बुडाशीं

असणारें एक तत्त्व आहे. तें असेंच अव्याहतपणें चालू राहणार. ज्यांची परमेश्वराच्याठिकाणीं श्रद्धा असेल त्यांना हें उमजणें सोपें जाईल, कारण त्यांना माहिती असतें कीं आमच्याकडून कोणत्याही प्रकारच्या मदतीची अपेक्षा करण्याएवढा परमेश्वर दुबळा नाहीं. हें विश्वचक्र जरी असेंच चालावयाचें असलें तरी आपलें ध्येय मुक्ति निःस्पृहता हेंच होय. कर्मयोगाच्या मतें हें ध्येय कर्माच्याच द्वारें गांठावयाचें असतें. जगाला पूर्णपणें सुखी करायच्या कल्पना कांहीं धर्मवेड्यांनां कदाचित् कर्मोत्तेजक होऊं शकतील, पण हें आपण लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, धर्मवेडेपणा जेवढें बरें तेवढेंच वाईटही करीत असतो. कर्मयोगी तुम्हांला असा प्रश्न विचारतो कीं, ' तुम्हांला कोणतेंही कर्म करण्यास आपल्या स्वाभाविक स्वातंत्र्यप्रीतीवांचून इतर कोणत्याही प्रकारची प्रेरणाच हवी कशाला? सर्वसाधारणपणें श्रेष्ठ मानल्या जाणाऱ्या या कर्म- प्रवर्तक हेतूंच्या पलीकडे जा- त्यांचा त्याग करा. " कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन", कर्म करण्यापुरताच तुम्हांला अधिकार आहे- कर्मफळावर नाहीं ' हें तत्त्व जाणण्याची आणि आचरण्याची योग्यता मनुष्य आपल्या अंगीं आणूं शकतो असें कर्मयोग्याचें म्हणणें आहे. जेव्हां सत्कर्मप्रवृत्ति त्याच्या अंगांत मुरत असते तेव्हां कर्मोत्तेजक बाह्य हेतूंची आवश्यकता त्यास भासत नसते. ' सत्कर्म करणें हेंच मुळीं कल्याणकारक आहे, म्हणून आम्ही सत्कर्म करावें. स्वर्गाच्या अपेक्षेने देखील केलेलें सत्कर्म बंधमूलक होत असतें', असें कर्मयोगी म्हणतो. अत्यंत क्षुल्लक असा हेतु बाळगून केलेलें कर्म सुद्धां आम्हांस मुक्त करण्याऐवजीं आमच्या पायांत आणखीन एक बंध जखडीत असतें.

म्हणूनच सर्व कर्मफलांचा त्याग करणें, त्यांच्यामध्यें आसक्त होऊन न राहणें, हाच एकमेव मार्ग होय. लक्षांत ठेवा कीं, हें जग म्हणजे आम्ही नव्हेत, आणि आम्ही हें जग नव्हे; आम्ही वास्तविक हें शरीर नाहीं आणि खरें पाहतां आम्ही कोणतें कर्मही करीत नसतों. चिरंतन सुखाचा आणि शांतीचा अनुभव घेणारा आम्ही आत्मा आहोंत. आम्ही कशासही आसक्त होऊन कां राहावें? आपण पूर्णपणें निरासक्त होऊन राहिलें पाहिजे हें खरें, आणि हा उपदेश करणेंही फार सोपें आहे. पण हें साधावें कसें ? निःस्पृहपणें आपण केलेलें प्रत्येक सत्कर्म आमच्या पायांत नवा बंध जखडण्याऐवजीं आमच्या जुन्या शृंखलांचा एक एक दुवा तोडीत असतें, आमच्यांतला आसक्तिरुपी

मळ हळूंहळूं काढीत असतें, आणि शेवटीं आम्हांस अत्यंत पवित्र बनवीत असतें. असें जरी असलें तरी कांहींना या गोष्टी कदाचित् अशक्य कोटींतील, स्वप्नाळूपणाच्या व कधींही आचरणांत न आणण्याजोग्या तत्त्वज्ञानाच्या आहेत असें वाटेल. भगवद्गीतेवरील बरेचसे आक्षेप मी वाचले आहेत. कित्येकांचें असें मत आहे कीं, हेतूवांचून कर्म करतांच येणें शक्य नाहीं. याला कारण एवढेंच कीं धर्मवेडेपणामुळें करण्यांत येणाऱ्या कर्मावांचून अहेतुकपणें केलेलें अन्य कोणतेंही कर्म त्यांच्या पाहाण्यांत कधींच आलेलें नाहीं; म्हणून ते तसें बोलत असतात.

या कर्मयोगाची शिकवण ज्याने प्रत्यक्ष आचरणांत आणली अशा एका माणसाविषयीं मला तुम्हांस आज शेवटचे चार शब्द सांगावयाचे आहेत. हा मनुष्य म्हणजे बुद्ध होय. कर्मयोग पूर्णपणें आचरणांत आणणारा हा एकच एक मनुष्य होय. एका बुद्धावांचून इतर साऱ्या धर्मसंस्थापकांना निष्काम कर्मामध्यें प्रवृत्त व्हावयाला बाह्य कोणतेतरी हेतु होते. या एक धर्मसंस्थापकाखेरीज इतर धर्मसंस्थापकांचे दोन वर्ग पाडतां येतील एक्ब वर्ग आपणास अवतार म्हणवून घेणाऱ्यांचा व दुसरा स्वतःस देवदूत म्हणविणाऱ्यांचा. यांपैकीं दोघेही आपलें कार्य साधण्यास बाह्य गोष्टींतूनच स्फूर्ति घेतात, आणि त्यांच्या शिकवणींत कितीही उच्च असे आध्यात्मिक विचार असेनात का, ते कोणत्या ना कोणत्या तरी बाह्य मोबदल्याची अपेक्षा करीत असतात. पण बुद्ध हा एकच असा धर्मसंस्थापक होता कीं जो म्हणाला, " मला तुमच्या ईश्वराविषयींच्या निरनिराळ्या कल्पनांशीं वा तात्त्विक सिद्धांतांशीं कांहींही कर्तव्य नाहीं. आत्म्याविषयींच्या निरनिराळ्या सर्व गूढ सिद्धांतांचा उगाच काथ्याकूट करीत बसण्यांत काय अर्थ आहे ? बरे व्हा आणि बरें करा. त्यामुळेंच तुम्हांला मुक्ति मिळेल आणि जें कांहीं सत्य असेल तें तुम्हांला गवसेल. " त्याच्या उभ्या जीवनांत आपल्या स्वतःसाठीं कांहींही मिळविण्याचा हेतु त्यानें बाळगला नाहीं. आणि सांगा, त्याच्याहून अधिक कार्य कोण करुं शकला? उभ्या इतिहासांत मला एक तरी अशी व्यक्ति दाखवा कीं जी एवढ्या उन्नत, एवढ्या सर्वोच्च अवस्थेला पोंचली. अखिल मानववंशाने असें एकच एक नररत्न दिलें कीं ज्याच्यांत असें थोर तत्त्वज्ञान, अशी सर्वगामी अनुकंपा दिसून येते. सर्वोच्च अशा तत्त्वज्ञानाची शिकवण देणाऱ्या या थोर तत्त्ववेत्त्याच्या पोटीं अत्यंत क्षुद्र अशा

पशुविषयींदेखील पराकाष्टेची दया वसत होती. त्यानें आपण अलौकिक पुरुष असल्याचें कधींच सांगितलें नाहीं, किंवा आपले स्वतःचे असे कोणतेच हक्क मांडण्याचाही प्रयत्न केला नाहीं. कोणत्याही प्रकारचा हेतु न बाळगतां कार्य करणारा हा एक आदर्श कर्मयोगी होय. मानवजातीचा इतिहास आम्हांस असें दर्शवितो कीं, याच्याएवढा थोर पुरुष कधींच जन्मला नाहीं. एवढी अलौकिक बुद्धि आणि इतकें विशाल हृदय यांचा अतुलनीय असा मिलाफ त्याचप्रमाणें अशी अत्यंत श्रेष्ठ आध्यात्मिक शक्ति इतर कोणत्याही व्यक्तींत आम्हांला दिसून येत नाहीं. या अवनीवर आजवर अवतीर्ण झालेल्या साऱ्या सुधारकांमध्यें तोच पहिला होय. " कोणतीही गोष्ट, काहीं प्राचीन ग्रंथ तसें सांगतात म्हणून किंवा तुमच्या देशांतील लोक तसें मानीत आले आहेत म्हणून, किंवा लहानपणापासून तशी ती तुम्हांला पढविण्यांत आली आहे म्हणून, मानूं नका. परंतु योग्य विमर्शीनंतर ती सर्वांस हितकर होईल असें तुमच्या विवेकबुद्धीला पटेल तरच ती स्विकारा, आणि स्वतः ती आचरणांत आणून इतरांसही ती आचरण्यास मदत करा", असें निर्भयपणें सांगणारा तोच पहिला उपदेशक होता. धनाची, मानाची वा इतर कशाचीही कामना न धरितां जो कर्म करीत असतो तोच अत्यंत श्रेष्ठ प्रकारचें कार्य करतो. जेव्हां कोणीही असें कर्म करुं शकेल तेव्हां तो बुद्ध होईल; आणि मग साऱ्या जगाचेंही परिवर्तन घडवून आणण्याजोगें कर्म करण्याची शक्ति त्याच्यामध्यें प्रकट होईल. असा मनुष्य म्हणजेच कर्मयोगाचा परम उच्च आदर्श होय.

## भक्तीचीं साधनें

भक्तियोगाच्या साधनांविषयीं भगवान श्री रामानुजाचार्य आपल्या ब्रह्मसूत्रांवरील भाष्यांत म्हणतात, " विवेक, विमोक, अभ्यास, क्रिया, कल्याण, अनवसाद व अनुद्धर्ष यांनीं भक्तीचा लाभ करुन घेतां येतो ".

कोणतें अन्न शुद्ध व कोणतें अशुद्ध याविषयींचा, व इतर बऱ्यावाईट गोष्टींचा विचार म्हणजे रामानुजाचार्यांच्या मतें ' विवेक ' होय. रामानुजांच्या मतें तीन कारणांमुळें अन्न अशुद्ध होत असतें:-

(1) कांहीं प्रकारचें अन्न स्वभावतःच अशुद्ध असतें. उदाहरणार्थ, लसूण वगैरे.

(2) पापी किंवा दुष्ट लोकांच्या संपर्कामुळें; त्यांच्याकडून आल्यामुळें.

(3) आणि केरकचरा, केंस वगैरेसारखे पदार्थ त्यांत पडल्यामुळें.

" आहारशुद्धीने सत्त्वशुद्धि होत असते, सत्त्वशुद्धीमुळें भगवंताचें अखंड स्मरण घडतें **(आहारशुद्धौ सत्वशुद्धिः सत्वशुद्धौ ध्रुवा स्मृतिः)** " ही छान्दोग्यश्रुति रामानुजाचार्य उद्धृत करितात.

हा अन्नाविषयींचा विचार भक्तांनीं नेहमींच फार महत्त्वाचा मानला आहे. कांहीं भक्तिसंप्रदायांनीं अन्नविचाराला अवास्तव महत्त्व दिलें आहे हें कबूल, पण याच्या बुडाशीं फार मोठें तत्त्व आहे, हेंही आपण मान्य केलें पाहिजे. आम्ही येथें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं जे सत्व, रज व तम - ज्यांच्या साम्यावस्थेला प्रकृति म्हणतात व त्यांची साम्यावस्था बिघडली म्हणजे जे सृष्टिरुपाने परिणाम पावतात - ते सांख्यमतानुसार प्रकृतीचे पदार्थ व गुण दोन्हीही आहेत. असें असल्यामुळेंच त्यांच्यापासून मानव देह घडला जातो. त्यांपैकीं सत्वांशाचें प्राधान्य असणें हें आध्यात्मिक उन्नतीला अत्यंत आवश्यक असतें. अन्न म्हणून जे पदार्थ आम्ही आमच्या शरीरांत घेत असतों त्यांवरच आमच्या मनाची घडण कशी होईल हें बव्हंशीं अवलंबून असतें. म्हणूनच आम्ही जें अन्न घेतों त्याविषयीं विशेष काळजी घ्यावी. परंतु, जसें बाकीच्या बाबतींत तसेंच इथेंही, शिष्यवर्गामध्यें जो अंधश्रद्धाळूपणा दिसून येतो त्यांचें खापर गुरुजनांच्या माथीं मारणें अयोग्य होईल.

आणि अन्नाच्या शुद्धाशुद्धतेचा विचार, कांहीं झालें तरी, गौणच होय. वर उद्धृत केलेल्या छान्दोग्योपनिषदांतील मंत्रावरील आपल्या भाष्यांत शंकराचार्यांनी आहार या शब्दाला निराळा अर्थ लावलेला आहे. सर्वसाधारणपणें आहार या शब्दाचा अर्थ अन्न असाच केला जातो. परंतु, शंकराचार्य म्हणतात, " आअहार म्हणजे एकत्र करणें; एकत्र करुन आंत घेतला जातो तो ' आहार '. भोक्त्याच्या ( आत्म्याच्या ) उपभोगासाठीं शब्दादि विषयांचें ज्ञान आंत घेतलें जातें. आहारशुद्धि म्हणजे इंद्रियांकडून गोळा केल्या जाणाऱ्या या ज्ञानाची शुद्धि, अर्थातच आहाराची शुद्धि ' म्हणजे इन्द्रियांच्याद्वारें विषयज्ञान मिळवीत असतां आसक्ति, द्वेष व मोह या दोषांनी अस्पृष्ट राहून तें मिळविणें, असा याचा अर्थ करावा. म्हणून असें हें ज्ञान किंवा हा आहार शुद्ध झाल्यावर मनुष्याची सत्त्वशुद्धि - अंतःकरणशुद्धि - होईल. मग अशी सत्त्वशुद्धि झालेल्याला शास्त्राध्ययनामुळें भगवंताच्या स्वरुपाची एकदां ओळख झाली असतां, त्याचें त्यास अनवच्छिन्न स्मरण

घडत असतें ".

हीं दोन्ही मतें वरकरणी परस्परविरुद्ध वाटतात, तरी हीं दोन्हीही सत्य व आवश्यक आहेत. या सूक्ष्म शरीराचा म्हणजेच मनाचा, संयम करणें हें स्थूल शरीराच्या संयमाहून अधिक श्रेयस्कर आहे यांत संशय नाहीं. पण मनाचा निग्रह करण्याचें सामर्थ्य मिळविण्यास स्थूल शरीराचा संयम अगोदर करणें अत्यंत आवश्यक आहे. म्हणून साधकाने आपल्या साधनेच्या प्रथमदशेंत गुरुपरंपरेने चालत आलेल्या आहारविषयक नियमांकडे विशेष लक्ष पुरविलें पाहिजे. पण या गोष्टींचा उगाच बाऊ करुन, अर्थशून्य अशा धर्मवेडेपणामुळें, आमच्या मधील अनेक धर्मपंथांनीं आपल्या धर्माला पूर्णपणें सैंपाकघरांतच कोंडून ठेवलेलें आम्हांला दिसून येतें. अशामुळें त्या धर्मांत निहित असलेलें उदात्त तत्त्व आध्यात्मिकतेच्या प्रकाशांत यायची आशाच नको. हा एक विलक्षणप्रकारचा शुद्ध जडवादच होय. यांत ज्ञान, कर्म वा भक्ति यांपैकीं कांहींही नाहीं. हें एक त्यांचें विशिष्ट प्रकारचें वेड आहे. अशा धर्मांत आसक्त होऊन राहणारे जे असतील त्यांना ब्रह्मलोकाऐवजीं वेड्यांच्या इस्पितलांची प्राप्ति होणेंच अधिक संभवनीय. तेव्हां हें आपल्याला सहज पटण्याजोगें आहे कीं उच्चतर अशी मानसिक स्थैर्याची अवस्था प्राप्त करुन घेण्यास आमच्या अन्नाची आम्ही विवेकपूर्वक निवड करणें आवश्यक आहे, कारण त्यावांचून ती साधणें कठिण आहे.

त्यानंतरची दुसरी गोष्ट ( विमोक ) म्हणजे भावनांच्या, मनोविकारांच्या आहारीं न जाणें. इंद्रियांना विषयोन्मुख होऊं न देणें, त्यांना आपल्या काबूंत ठेवून त्यांस आपल्या इच्छेनुसार वागावयास लावणें. हा गुण धार्मिकतेचा गाभाच होय.

त्यानंतरची गोष्ट म्हणजे आत्मसंयम व स्वार्थत्याग यांचें परिशीलन. यालाच अभ्यास म्हणतात. साधकाला भक्ताला निरंतर या ' अभ्यासा ' वांचून हा ईश्वरसाक्षात्काराचा मार्ग सुगम होणार नाहीं. " सदैव प्रभुचिंतनींच मन लावायला हवें". मनाला ईश्वरचिंतन करण्यास लावणें हें आरंभीं कठिण जात असतें; परंतु त्यासाठीं करण्यांत येणाऱ्या प्रत्येक प्रयत्नागणिक ही ध्यान करण्याची शक्ति उत्तरोत्तर वाढत जात असते गीतेंत अर्जुनाला श्रीकृष्ण म्हणतात, ' हे कुन्तिपुत्रा ! अभ्यास आणि वैराग्य यांद्वारेंच मनोनिग्रह साधतां येतो. **( अभ्यासेन तु कौन्तेय वैराग्येण च गृह्यते )'**

यानंतर ' क्रिया ' यज्ञयागादि कर्म. नेहमी करावयाचे पंचमहायज्ञही केलेच पाहिजेत असें सांगण्यांत आलें आहे.

त्यानंतर ' कल्याण ' पावित्र्य. भक्तीचें मंदिर पवित्रतेच्या पायावरच सर्वस्वी उभारलेलें असतें. बाह्य शौच शरीर निर्मल ठेवणें किंवा अन्नाविषयींचे निर्बंध पाळणें. या दोन्ही गोष्टी तितक्याशा कठिण नाहींत, आणि अंतःशुचित्वावांचून, पावित्र्यावांचून बाह्य आचारांना मुळींच किंमतही नाहीं. श्रीरामानुजांनीं अंतःशुद्धीला पोषक असणाऱ्या गुणांची येणेप्रमाणें यादी दिलेली आहे. ' सत्य' खरेपणा; ' आर्जव' सरलता; ' दया ' कोणतीही स्वार्थपर भावना न ठेवतां परहित साधणें; ' अहिंसा' कायावाचामनेंकरुन इतरांस न दुखविणें; ' अनभिद्या ' परकीय वस्तूंची अभिलाषा न बाळगणें, वृथा विचार टाकणें, आणि दुसऱ्यांनीं दिलेल्या त्रासाचें चिंतन न करणें. या यादींतील खास उल्लेखनीय असा गुण म्हणजे ' अहिंसा ' इतरांस इजा न पोंचविणें, सर्व भूतमात्रांशीं अहिंसाव्रत धारण करणें; हें आमचें कर्तव्य आहे. कांहीं लोक असें मानतात कीं माणसांना मात्र पीडा देऊं नये, मानवेतर पशुपक्ष्यांशीं निर्दयतेने वागलें तरी चालेल. कांहीं इतर लोक म्हणतात कीं, कुत्र्यामांजरांना पाळावें, मुंग्यांना साखर घालावी पण आपल्याच मानवबंधूंशीं आपण कसेंही वागलों,

त्यांना कितीही भयंकर दुःख दिलें, तरी चालेल आमची अहिंसेची कल्पना अशा प्रकारची नाहीं. हेंही आपण लक्षांत ठेवलें पाहिजे की या जगांतील कोणतीही चांगली कल्पना किळस येण्याजोग्या अतिरेकापर्यंत नेऊन पोंचवितां येते. कोणत्याही नियमाचा वाच्यार्थ घेऊन मग तो नियम कितीही चांगला का असेना तो अतिरेकास नेला तर त्यापासून निश्चित अहित होत असतें. कांहीं धर्मसंप्रदायांतील बैरागी, आपल्या अंगावरील कृमिकीटक कदाचित् मारले जातील म्हणून, स्नानच करीत नसतात. आपल्या दुर्गंधीने इतरांना ते कसे बेचैन करितात, आपल्या बंधुजनांमध्यें ते रोग कसे पसरवितात हें त्यांच्या मुळीं लक्षांतच येत नाहीं ! अर्थातच हे लोक वैदिक धर्मातले नव्हेत.

द्वेष मत्सरादिकांचा अभाव हीच अहिंसेची कसोटी होय. तात्कालिक भावनेच्या भरांत, धर्मभोळेपणामुळें, वा पुरोहितांच्या कपटाईला बळी पडून कोणीही मनुष्य एखादें सत्कर्म करुं शकेल किंवा दान देईल; परंतु जो

कुणाचाही कधींही मत्सर करीत नाहीं तोच मानवजातीवर खरेंखुरें प्रेम करणारा आहे असें जाणावें. आपण असें पाहतों कीं या जगांतील थोर मानलीं जाणारीं जवळजवळ सारींच माणसें इवल्याशा नांवासाठीं, कीर्तिसाठीं वा धनासाठीं एकमेकांचा हेवा करितात. जोंवर हृदयांत मत्सराला स्थान आहे तोंवर तेथें अहिंसा वृत्ति पूर्णत्त्वाला पोंचण्याची आशाच नको. गाय किंवा बकरी मांस खात नसते. त्यांना आपण श्रेष्ठ योगी मानावें काय ? त्याच थोर अहिंसक काय ? एखाद दुसरा पदार्थ न खाणें, हें कुणीही - एखादा क्षुल्लक मनुष्य देखील- करुं शकेल. केवळ त्यामुळेंच त्याला एखाद्या गवतावर जगणाऱ्या पशूपेक्षां अधिक महत्त्व खचित येणार नाहीं. जो मनुष्य पैशासाठीं विधवांना आणि अनाथ बालकांना फसवितो, अत्यंत नीच कृत्यें करतो, तो मग केवळ गवतावरच जगत असला तरी कोणत्याही पशूहून अधम होय. ज्या मनुष्याच्या मनांत कुणालाही दुखविण्याचा विचार देखील येत नाहीं, जो आपल्या कट्टर शत्रूंच्या देखील अभ्युदयाने आनंदित होतो, तोच खरा भक्त होय, तोच योगी, तोच सर्वांचा गुरु; मग तो आपल्या आयुष्यभर प्रतिदिनीं डुकराचें मांस खाऊन राहात असला तरी त्याचें काय ? म्हणूनच आम्ही एवढें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं जोंवर आमची अन्तःशुद्धि वाढविण्यास त्याची जरुरी असते तोंवरच बाह्याचाराला मोल असतें. जेव्हां बाह्य आचार कांटेकोरपणें पाळणें साध्य नसतें, तेव्हां अन्तःशुद्धीच ठेवणें अधिक श्रेयस्कर होय. परंतु धर्माच्या या खऱ्या, आंतरिक आध्यात्मिक तत्त्वांना विसरुन जो मनुष्य किंवा जें राष्ट्र केवळ साऱ्या बाह्य आचारांना अविचाराने जणूं आपला प्राण समजून कवटाळून राहतें, तें सोडूं इच्छित नाहीं, त्याचा धिक्कार असो. बाह्य आचार हे आपल्या अंतराचे आविष्कार असावे लागतात. आपलें आंतरिक जीवन- आपलें अंतःकरण त्यांत प्रतिबिंबित झालें पाहिजे; तरच त्यांस मोल; नपेक्षां नाहीं. हा आचार जर आपलें अंतर- आंतरिक जीवन प्रकट करणारा नसेल, तर त्याची मुळींच गय न करतां त्यास तुडवून टाका.

भक्तियोगाची यानंतरची पायरी म्हणजे ' अनवसाद ' किंवा बल. बलहीनानां ह्या आत्म्याचा लाभ होत नसतो. ( नायमात्मा बलहीनेन लभ्यः ।) असें श्रुति सांगते. येथें ' बल ' याचे शरीरबल व मनोबल असे दोन्ही अर्थ करावेत. " जे बलवान् , कणखर असतात " तेच भक्तिमार्गाचे अधिकारी

साधक होतात. दुबळ्या, क्षुद्र, पंगु पामरांना काय करवणार ? अशा माणसांतील शारीरिक वा मानसिक गूढ शक्ति योगाभ्यासामुळें अत्यंत अल्प प्रमाणांत देखील जागृत झाली असतां त्यांच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडतील. ” तरुण, निकोप प्रकृतीचीं, बलवान ” माणसेंच योगांत यश मिळवूं शकतात. म्हणूनच शरीरबल अत्यंत आवश्यक असतें. इन्द्रियांवर ताबा ठेवण्यास करण्यांत येणाऱ्या प्रयत्नांच्या प्रतिक्रिया केवळ सुदृढ शरीरच सहन करुं शकतें. ज्याला भक्त व्हावयाचे असेल त्याला सशक्त व निरोगी असावें लागतें. जेव्हां अत्यंत दुबळे लोक कोणत्याही योगाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न करितात तेव्हां त्यांना एखादा दुर्दम्य रोग जडण्याचा, किंवा त्यांची बुद्धि क्षीण होण्याचा संभव असतो. आत्मसाक्षात्कारासाठीं मुद्दाम देहदंडाने शरीर दुबळें करावयास शास्त्रानें सांगितलेलें नाहीं.

कमकुवत मनाचे देखील आत्मसाक्षात्कार करुन घेऊं शकणार नाहींत. ज्याला भक्त व्हायचें असेल त्यानें सदैव आनंदित असलें पाहिजे. पाश्चात्यांमध्यें अशी समजूत आहे कीं धार्मिक मनुष्य म्हटला म्हणजे त्याने कधी हसूं नये, त्याच्या मुखावर नेहमीं कृष्णछाया पसरलेली, गालफडें बसलेला व जणूं औदासिन्याची मूर्ति असाच तो असावा. कृश, खिन्नवदन लोकांनीं वैद्याचा सल्ला घ्यावा- ते रोगी; योगी नव्हेत. उल्हसित मनांतच धैर्य व चिकाटी वसत असतात. बलशाली मनच हजारों अडीअडचणींतून आपला मार्ग काढूं शकतें. हें मायाजाल फाडून बाहेर येण्याचें दुर्घट कार्य केवळ प्रचंड इच्छाशक्तीनें युक्त अशा माणसांसाठींच आहे.

त्याचबरोबर हेंही खरे कीं अति हर्षही टाळलाच पाहिजे. अतिहर्षाच्या त्यागालाच ' अनुद्धर्ष ' म्हणतात. अतिहर्षामुळे आपण कोणताही गंभीर विचार करण्याचें आपले सामर्थ्य गमावून बसतों. हर्षातिरेकाने आपली मानसिक शक्ति वृथा उधळली जाते. जेवढें मन बलवान होईल तेवढा त्याचा भावनावश होण्याचा संभव कमी. अति औदासीन्य जेवढें वाईट तेवढाच अति उल्हासही वाईट आहे. सारे आध्यात्मिक अनुभव स्थिर, शांत व समचित्तालाच लाभूं शकतात.

हीं वर सांगितलेली साधनें केल्यानेच भगवद्भक्ति कशी करावी हें आपल्याला कळेल.

### आत्मा - त्याचा बंध व मुक्ति

( स्वामी विवेकानंदांनीं अमेरिकेंत दिलेल्या व्याख्यानाचा अनुवाद )

या विश्वांत सत्य एकच आहे, तें ब्रह्म होय, असे अद्वैत तत्त्वज्ञानाचे सांगणें आहे; ब्रह्मावांचून सारें काहीं असत्य ब्रह्माच्या मायानामक शक्तिमुळें झालेला ब्रह्माचाच आविष्कार किंवा विलास. त्या ब्रह्मामध्यें पुनः एकरुप होणें हेंच आमचें ध्येय. आम्ही, आमच्यापैकीं प्रत्येकजण, तें सत्य, तें ब्रह्मच आहोंत; परंतु त्याचबरोबर आमच्यांत मायादेखील आहे. या मायेचा, वा अविद्येचा, आम्ही जर निरास करुं तर आम्ही आमच्या निजस्वरुपास प्राप्त होऊं. या तत्त्वज्ञानानुसार प्रत्येक मनुष्य तीन अंगांनी युक्त असतोः शरीर, अंतःकरण किंवा मन, आणि त्यापलीकडील आत्मा. स्थूलशरीर हें या आत्म्याचे बाह्यावरण असून मन हें त्याचें आंतर आवरण आहे. आत्मा हाच खरा द्रष्टा - किंवा साक्षी आहे. तोच भोक्ता आणि तोच या शरीरांत वास करणारा पुरुष होय. तोच अंतःकरण वा मनाच्या सहाय्याने या स्थूल शरीराकडून कार्य करवून घेत असतो. आत्मा तेवढेंच या मानवी शरीरामधील अभौतिक तत्त्व होय. तो अभौतिक असल्यामुळेंच कोणत्याही पदार्थांचा संघात असूं शकत नाहीं विक्रियावान नाहीं, म्हणूनच तो अमर आहे. ज्या वस्तूला मरण नसतें तिला जन्मही असू शकत नाहीं; कारण ज्याला जन्म आहे त्याला मरण हें ठेवलेलेंच. यावरुन असेंही ओघानेच प्राप्त होतें कीं या आदि अंत हीन वस्तूला रुप, आकार असणेंही अशक्य. रुप किंवा आकार असणें हें ती वस्तु जड असल्यावांचून संभवनीय नाहीं. ज्या ज्या वस्तूला रुप म्हणून आहे त्या त्या वस्तूला आदि व अंत अटळ आहेत. जिला आदि किंवा अंत नाहीं अशी एकही वस्तु आम्हां कुणाच्याही पाहण्यांत आलेली नाहीं. जड द्रव्य व शक्ति यांच्या संयोगापासून रुपाची उत्पत्ति होत असते. या खुर्चीला एक विशिष्ट आकार आहे, म्हणजेच एका विशिष्ट परिमाणाच्या जड द्रव्यावर एका विशिष्ट प्रमाणांतील शक्तीचा आघात झाला आणि त्यामुळेंच त्याला एक विशिष्ट रुप आलें. कोणताही आकार हा जड द्रव्य व शक्ति यांच्या संयोगाचाच परिणाम होय. हा संयोग नित्य असू शकत नाहीं; प्रत्येक संयुक्त द्रव्याला असा एक काल आलाच पाहिजे कीं जेव्हां त्याचें विघटन होईल, तेव्हां प्रत्येक साकार वस्तूला आदि व अंत आहेतच. आमचें शरीर नाश पावलेंच पाहिजे, हें आम्हांस माहीत आहे. त्याचा जन्म झाला आणि त्याला मरण ही येणारच. परंतु आत्म्याला शरीरच नसल्यामुळें,

तो जन्म-मरणाच्या नियमानें बद्ध झालेला नाहीं. तो अनंत काळापासून अस्तित्वांत आहे. काळ जसा अनादि आहे तसाच मनुष्याचा आत्माही अनादि आहे. दुसरी गोष्ट म्हणजे तो सर्वव्यापक आहे. साकार वस्तुच अवकाशाने मर्यादित किंवा अवच्छिन्न झालेली असते. निराकार वस्तु अवकाशाने सीमित होऊं शकत नाहीं, म्हणून अद्वैत वेदांताच्या मतें तुमच्यांतील आत्मा, माझ्यांतील आत्मा आणि प्रत्येकामधील आत्मा सर्वव्यापी आहे. तुमचें अस्तित्व जेवढें या पृथ्वीवर आहे तेवढेंच तें सूर्यावर आहे. जेवढे तुम्हीं अमेरिकेंत आहांत तेवढेच इंग्लंडांत आहांत. परंतु आत्मा, मन व शरीर यांमधून कार्य करीत असल्यामुळें, ती जेथें असतील तेथेंच त्याचें कार्य दृष्टोत्पत्तीस येईल.

आपण करतों तें प्रत्येक कर्म, आपण मनांत आणतों तो प्रत्येक विचार आपल्या मनावर एक ठसा पाडीत असतो, यालाच संस्कृत भाषेंत संस्कार असें म्हणतात. आणि हे सगळे संस्कार एकवटून आपल्यामध्यें " चारित्र्य " नांवाची एक प्रचंड शक्ति निर्माण करीत असतात. " चारित्र्य " हें कोणत्याही मनुष्याने स्वतःसाठीं स्वतःच घडविलेलें असतें; त्यानें आपल्या जीवनांत केलेल्या शारीरिक व मानसिक क्रियांचा तो परिपाक होय. या संस्कारांचा समुदायच कोणाही माणसाला प्राप्त होणाऱ्या मरणोत्तर गतीची दिशा ठरवीत असतो. मनुष्य मरतो, शरीर गळतें व पंचमहाभूतांमध्यें लीन होतें. परंतु संस्कार मनाला चिकटून राहतात आणि मन सूक्ष्म द्रव्याचें बनलेलें असल्यामुळें त्याचें लवकर विघटन होत नाहीं; कारण द्रव्य जेवढें सूक्ष्म, तेवढें तें अधिक काल टिकणारें असतें. पण मन देखील अंतीं, केव्हांना केव्हांतरी, विरुन जातें आणि तें साधण्यासाठींच तर आमची सारी धडपड असते. या संदर्भांत सर्वांत उत्तम उदाहरण मला सुचतें तें चक्रवाताचें. विविध दिशांतून येणारे वाऱ्याचे विविध प्रवाह एकत्र होतात आणि चक्रगतीने फिरुं लागतात. असे ते चक्राकारगतीने फिरत असतां, कागदाचे तुकडे, गवताच्या काड्या वगैरे एका जागीं आणून धुळीचे मनोरे उभारतात आणि मग तो सारा गाळ तेथेंच टाकून पुढें दुसऱ्या जागीं जाऊन तेथेंही तसेच हे वारे गोलाकार फिरुन फिरुन आपल्या समोरील सगळा केरकचरा, धूळ वगैरे घेऊन दुसरे स्तंभ उभे करीत असतात. याचप्रमाणें, संस्कृतमध्यें ज्यांना आपण प्राण म्हणतों त्या शक्ति एकत्र येतात व जड द्रव्यापासून देह

आणि मन उभारतात, आणि हें स्थूल शरीर गळेपर्यंत तेथें कार्य करीत राहतात; मग त्या दुसऱ्या द्रव्यांपासून दुसरें एक शरीर तयार करितात आणि मग हें शरीर पडल्यावर आणखीन एक निर्मिला जातो. आणि अशा रीतीने हा क्रम चालू राहतो. जड द्रव्याच्या अभावीं शक्ति एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जाऊं शकत नसते, म्हणूनच हें स्थूल शरीर पडलें तरी अंतःकरण, ज्ञानेंद्रियें व कर्मेंद्रियें राहातच असतात. संस्कारांच्या रुपाने त्यांच्यावर प्राण कार्य करीत असतो व यांना घेऊन दुसऱ्या ठिकाणीं जातो. तेथें नवी द्रव्यें घेऊन दुसरें आवर्त उठवितो व फिरुन त्यांत कार्य करुं लागतो. अशाप्रकारें एकीकडून दुसरीकडे, आपली सारी शक्ति क्षीण होईपर्यंत, तो प्रवास करीत असतो व मग अंतीं आपणही विराम पावतो. यासाठीं जेव्हां मन संपुष्टांत येईल, त्याच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडून चूर होऊन जाईल, फिरुन संस्कार म्हणून उरणार नाहींत, तेव्हांच आम्ही पूर्णपणें मुक्त होऊं, तोंवर आम्ही बद्धच राहूं. तोपर्यंत आत्मा अंतःकरणाच्या या भोंवऱ्यांतच अडकलेला असतो आणि त्यामुळें त्याला आपण एकीकडून दुसरीकडे नेले जात आहोंत असा भ्रम होत असतो. जेव्हां हा भोंवरा शमेल, विराम पावेल, तेव्हां आत्म्याला आपण सर्वव्यापी असल्याचें कळून येईल. मग तो आत्मा वाटेल तेथें जाऊं शकतो. तो पूर्णपणें स्वतंत्र असतो, आणि त्यास वाटेल तेवढीं मनेंही तो निर्माण करुं शकतो, पण तोपर्यंत मात्र त्याला या चक्रवाताबरोबरच जावें लागेल. ज्या ध्येयाप्रत आम्ही सर्वजण वाटचाल करीत आहोंत तें हेंच स्वातंत्र्य होय.

समजा या खोलींत एक चेंडू आहे आणि आमच्यापैकीं प्रत्येकाच्या हातांत एक लाकडी हातोडा आहे; आणि प्रत्येकटा या आपापल्या हातोड्याने त्यावर शेंकडों टोले हाणतो व एका टोंकापासून दुसऱ्या टोंकाकडे पाठवितो. मग शेवटीं हा चेंडू खोलीबाहेर जातो. तर तो किती वेगाने व कोणत्या दिशेने जाईल ? या दोन्ही गोष्टी त्या खोलींत असतां सर्वत्र त्याच्यावर विविध शक्तींचे जे आघात झाले त्यांच्यावरच अवलंबून राहील. त्याला देण्यांत आलेल्या साऱ्या आघात- प्रत्याघातांचे परिणाम हे झालेच पाहिजेत. आमची प्रत्येक क्रिया, ती मग मानसिक असो वा शारीरिक असो, या टोल्याप्रमाणेंच आहे मानवी मन म्हणजे टोले हाणून उडविला जाणारा एक चेंडू आहे. आम्ही देखील तसेच या जगाच्या खोलींत इकडून

तिकडे हाणले जात आहोंत. आणि येथून आम्ही कसे निसटूं हें आम्हांला मिळालेल्या एकूण टोल्यांच्या शक्तीवरच अवलंबून राहील. ज्याप्रमाणें त्याला मारण्यांत येणारे टोले चेंडू कोणत्या दिशेने जाणार व किती वेगाने जाणार हें ठरवीत असतात, त्याचप्रमाणें या जगांत आम्ही केलेल्या साऱ्या क्रिया आम्हांला पुढें कोणता जन्म मिळणार हें ठरवीत असतात. असें असल्यामुळें आमचा हा जन्म आमच्या पूर्वजन्मांतील क्रियांचाच परिणाम होय. ही एक गोष्ट झाली. आतां समजा, मी तुम्हांला, काळ्यानंतर पांढरा व पांढऱ्यानंतर काळा असे अनंत दुवे असलेली, एक सांखळी देतों. या सांखळीला आरंभही नाहीं व अखेरही नाहीं आणि समजा मी तुम्हांला या सांखळीचें स्वरुप काय म्हणून विचारतों. दोन्हीही टोकें नसलेल्या अशा त्या सांखळीच्या स्वरुपाची तुम्हांला प्रथमतः कल्पना करणेंच जड जाईल, पण हळुहळु तुम्हांला कळून येईल कीं ती एक सांखळी आहे. मग थोड्या वेळांत तुमच्या निदर्शनास येईल कीं, आळीपाळीने काळे व पांढरे दुवे जोडून, त्यांच्या असंख्यवार केलेल्या दोन्ही दुव्यांच्या पुनरावृत्तीची, ती एक आदिअंतहीन सांखळी आहे. या सांखळीच्या एका दुव्याचेंही तुम्हांला ज्ञान झालें तर तुम्हांला या सबंध सांखळीचें ज्ञान होईल, कारण ती सांखळी म्हणजे त्याच त्याच दुव्यांची पुनरावृत्ति होय. आमचे सारे जन्म- भूत, वर्तमान व भविष्य - मिळून ही अनाद्यनन्त शृङ्खला होते. प्रत्येक जन्म म्हणजे या सांखळीची एक एक कडी होय. आणि जनन व मरण हीं या कडीचीं दोन टोकें होत. येथें आमच्या स्वभावाची आणि कर्मांची, थोड्या फार फरकाने, पुनः पुनः पुनरावृत्ति होत असते. म्हणून या दोन्ही कड्यांचें ज्ञान झालें असतां आम्हांला कोणकोणत्या मार्गांनी जावें लागेल - कोणती गति किंवा कोणत्या अवस्था प्राप्त होतील- हें सारें कळेल. तेव्हां यावरुन आम्हांला दिसून येतें कीं आपण मागें ज्या ज्या जन्मांतून प्रवास करीत आलों आहोंत त्यांच्यावरच आम्हांला आतां मिळणारी गति ( जन्म ) अवलंबून राहील. तसेंच आमच्या पूर्वकर्मांमुळेंच आम्हांला हा जन्म प्राप्त झाला आहे. जसे या जगांतून जात असतां आम्ही या जन्मीं केलेलीं सारीं कर्में घेऊन जात असतों, तसेंच आमच्या आदल्या जन्मांतील सर्व कर्मांचा भार घेऊनच आपण हा जन्म घेत असतों हेंही तुमच्या लक्षांत येईल. जी शक्ति आम्हांस जगाबाहेर नेत असते तीच शक्ति आम्हांला येथें आणीत असते. आम्हांला येथें आणतें कोण? आमचीं पूर्वकर्में. येथून

आम्हांला कोण नेत असतें? आम्हीच येथें आचरलेलीं कर्मे. आणि असेच आम्ही सारखे एकामागून एक जन्म घेत असतों. ज्याप्रमाणें सुरवंट आपल्याच मुखावाटे तंतु काढून त्यांपासून आपला कोशेटा बनवितो आणि शेवटीं त्याच कोसल्यांत अडकला जातो. त्याचप्रमाणें आम्ही सुद्धां आमच्याच कर्मांचें जाळें विणून त्याच्यांत अडकून स्वतःला बद्ध करुन घेतलें आहे. हा कार्यकारणाचा नियम आम्हीच चालू केलेला आहे, आणि आतां आम्हांला त्यांतून निसटणें जड होऊन बसलें आहे. चक्राला आम्हीच गति दिलेली आहे आणि आतां आम्ही त्याखालीं चिरडले जात आहोंत. म्हणून हें तत्त्वज्ञान सांगतें कीं आम्ही आमच्या बऱ्यावाईट कर्मांनीं सारखेच बद्ध होत असतों.

आत्मा कधींही येत नसतो वा जातही नसतो. त्याला जन्म नाहीं आणि मरणही नाहीं. पण या आत्म्या समोरुन प्रकृतीची ये-जा चालू असते. तिचीं प्रतिबिंबें आत्म्यावर पडत असतात आणि आत्मा भ्रांति पावल्यामुळें त्याला वाटतें कीं तोच फिरत आहे, प्रकृति नव्हे. जेव्हां तो बद्ध होतो, व जेव्हां त्याला उमजतें कीं तो अचल आहे, तो सर्वव्यापी आहे, तेव्हा त्याला मुक्ति लाभते. बद्धात्म्याला जीव ही संज्ञा आहे. जेव्हां आपण आत्मा येतो किंवा जातो असें म्हणतों, तें केवळ आमच्या सोयीसाठीं, केवळ व्यावहारिक दृष्टीनें. उदाहरणार्थ, खगोलशास्त्राचा अभ्यास करीत असतां, वस्तुस्थिति तशी नसतां देखील, सूर्य पृथ्वीच्या भोंवतीं फिरत असतो असें तुम्हांला गृहीत धरण्यास सांगण्यांत येतें.

याप्रमाणें जीवाला, जीवात्म्याला, उच्च किंवा नीच अवस्था प्राप्त होत असतात. हाच तो पुनर्जन्माचा प्रसिद्ध नियम, सारी सृष्टि या नियमाने बद्ध आहे.

पशूपासून उत्क्रांत होऊन मनुष्य झालेला आहे ही कल्पना या देशांतील लोकांना अतिशय भयंकर वाटते. ती तशी कां वाटावी ? या कोट्यावधि प्राण्यांचें काय व्हायचें ? ते म्हणजे कांहींच नव्हेत काय ? जर आम्हांला आत्मा आहे तर तो त्यांनाही आहे; त्यांना तो नाहीं तर आम्हांलाही तो नाहीं. मनुष्याला तेवढाच आत्मा आहे, इतर प्राण्यांना तो नाहीं असें मानणें असमंजसपणाचें होईल. पशुहूनही नीच अशीं माणसें माझ्या पहाण्यांत आलेलीं आहेत. एका शरीरांतून दुसऱ्या शरीरांत जात जात,

आपल्या संस्कारानुरुप उच्च व नीच योनींतून या मानवी आत्म्याने प्रवास केलेला आहे. परंतु सर्वोच्च अशा मानवी शरीरांतच त्याला मुक्ति मिळूं शकते. मानवी शरीर हें देवदूतांच्या शरीराहून किंवा दुसऱ्या कोणत्याही शरीराहून श्रेष्ठ आहे. केवळ मनुष्यच मुक्ति मिळवूं शकतो आणि म्हणूनच तो या सृष्टींतील सर्वश्रेष्ठ प्राणी होय.

हें अखिल विश्व ब्रह्मामध्यें होतें; त्यांतूनच हें जणूं बाहेर फेकलें गेलें आहें. विद्युत-प्रवाह जनक यंत्रातून जशी वीज बाहेर येते आणि आपला फेरा पूर्ण करुन पुनः त्या यंत्राकडे जाते, तद्वतच हें बाहेर फेकलें गेलेलें विश्व आपल्या उगमस्थानाकडे फिरुन येण्यासाठीं सारखें मार्गक्रमण करीत असतें. आत्म्याच्या बाबतींतहीं तसेच आहे. ब्रह्मातूनच बाहेर फेंकला गेलेला हा आत्मा, वनस्पति आणि प्राणी यांच्या विविध शरीरांतून प्रवास करीत, शेवटीं या मानवदेहाप्रत आलेला आहे.आणि मनुष्य हा ब्रह्माच्या अत्यंत जवळचा आहे. ज्यापासून आपण निघालों त्या ब्रह्माप्रत जाण्याचा प्रयत्न करणें ही जीवनांतील अत्यंत मोठी धडपड होय; हें मग मनुष्याला माहीत असो वा नसो, तो मोठासा प्रश्न नाहीं. या सृष्टींत खनिज पदार्थ, वनस्पति अथवा प्राणी यांच्यामध्यें जी गति, जी धडपड दिसून येते ती पुनश्च केंद्राकडे ( उगमस्थानाकडे ) येण्यासाठीं, शांत होण्यासाठीं केलेली खटपट होय. जी आधीं साम्यावस्था होती तिच्यांत बिघाड झाला; आणि सारे अंश, अणु व परमाणु ती बिघडलेली साम्यावस्था पुनः स्थापिण्यासाठीं धडपडत आहेत. ही त्यांची धडपड चालवीत असतां ते एकत्र येण्याचा, पूर्वरुप धारण करण्याचा, प्रयत्न करितात. हें अद्‌भुत विश्व त्या प्रयत्नांचेच फळ आहे. प्राण्यांच्या जीवनांत, वनस्पति जीवनांत, आणि इतरत्र ज्या कांहीं खटपटी, ज्या चढाओढी, तसेंच सामाजिक चळवळी आणि युद्धें दिसून येतात, तीं सर्व ही साम्यावस्था पुनः गांठण्यासाठीं सदैव करण्यांत येणाऱ्या परिश्रमांचीच दृश्य स्वरुपें होत.

जन्मापासून मरणापर्यंत चालणारी जी ही जीवनयात्रा तिलाच संस्कृत भाषेंत संसार असें म्हणतात; संसार याचा अक्षरशः अर्थ होतो जन्म-मरणाचें चक्र. सारी सृष्टि या चक्रांतून जात जात, कधींतरी, मुक्त होणारच. आतां कदाचित् असा प्रश्न विचारण्यांत येईल कीं सर्वचजण जर मुक्त होणार आहेत, तर मग आम्ही त्या मुक्तीसाठीं मुद्दाम 'धडपड' कां करावी.

प्रत्येकजण मुक्त होणार असला तर आम्ही त्या मुक्तीची स्वस्थपणें वाट पहात बसूं. प्रत्येकटा कधीं ना कधीं मुक्त होणार हें खरें; कुणीही या मुक्तीला आंचवणार नाहीं. कशाचाच नाश होणार नाहीं. प्रत्येकाची उन्नति झालीच पाहिजे. असें असेल तर एवढी धडपड करण्यांत काय अर्थ ? प्रथमतः, या केन्द्राकडे येण्यास धडपड हें एकमेव साधन आहे, आणि दुसरी गोष्ट म्हणजे, आम्ही कां धडपड करतों तें आम्हांला कळत नाहीं. आम्हांला ती करावीच लागते. " सहस्त्रावधि माणसांमध्यें एखाद्याच्या मनांत आपण मुक्त व्हावें ही भावना जागृत होत असते ", बहुसंख्य मानव भौतिक वस्तूंनीच संतुष्ट होऊन राहतात; पण कांहींना जाग आलेली असते; त्यांना येथील या खेळाचा वीट आलेला असतो आणि स्वस्थानीं परतावेंसें वाटतें. असे हे लोक बुद्धिपुरःसर प्रयत्न करीत असतात आणि इतर लोक न जाणतां तो करीत असतात.

सार्‍या वेदान्ताचें तात्पर्य म्हणजे ' जगाचा त्याग ' (संगत्याग ) करणें. मिथ्याचा अव्हेर करुन सत्यास वरणें. जे विषयांमध्ये आसक्त झालेले असतील ते कदाचित् म्हणतील, त्या मध्यबिंदूकडे ( उगमस्थानाकडे ) जायला आम्ही जगाचा ( विषयासक्तीचा ) त्याग कां करायला हवा ? आम्ही सर्वजण ईश्वरापासून आलेलों आहोंत असें मानलें तरी हें जग सुखावह आहे, ठीक आहे. तेव्हां त्याऐवजीं मिळवितां येईल तेवढें ऐहिक सुखच मिळविण्याचा आम्ही कां प्रयत्न करुं नये? या जगापासून पळण्याचा आम्ही कां प्रयत्न करावा? ' ते म्हणतात, ' या जगांत दिवसेंदिवस होत असणार्‍या सुधारणांकडे पहा ! किती सुखसोई त्यांपासून आम्हांला मिळतात ! किती चैन करतां येते ! खरोखरीच हें जग अतिरम्य आहे, उपभोग्य आहे. यापासून आम्ही कां दूर जावें ? आणि आहे हें टाकून अन्याच्या खटपटीस कां लागावें? ' याला उत्तर एवढेंच कीं हें जग अवश्य नाश पावणारें आहे. त्याचा चक्काचूर होणार, हें निश्चित. आणि हेच भोग आम्ही अनेकवार भोगलेलेही आहेत. आम्ही जीं हीं नानाविध रुपें पाहातों तीं सर्व या अगोदर पुनः पुनः व्यक्त होऊन गेलेलीं आहेत; आणि आज ज्या जगांत आम्ही राहातों त्याच्या आजवर अनेक आवृत्ति झालेल्या आहेत. या आधीं अनेकदां मी तुमच्याशीं बोललेलों आहें, आणि आतां जे माझे शब्द तुम्ही ऐकत आहांत ते तुम्ही या अगोदर अनेकवार ऐकलेले आहेत, आणि तें असें असलेंच पाहिजे हेंही

तुमच्या लक्षांत ऐईल. एवढेंच नव्हे तर या पुढेंही तें तसेंच अनेकदां होत राहील. आत्मे नाना कधींच नव्हते. शरीरें मात्र अव्याहतपणें नाश पावत आहेत आणि जन्म घेत आहेत. दुसरें म्हणजे या गोष्टी त्या त्या काळीं नियमितपणें घडत असतात. समजा येथें तीन चार फांसे आहेत. आणि ते जेव्हां आपण टाकतों तेव्हां एकावर आम्हांला पांच दिसतात, दुसऱ्यावर चार, तिसऱ्यावर तीन, आणि चौथ्यावर दोन. असे जर तुम्ही फांसे सारखे टाकीतच राहिलांत तर केव्हां ना केव्हां अशा वेळा येतील कीं जेव्हां फिरुन तुम्हांला अगदीं तेच आंकडे आलेले दिसतील. तसेच फेंकीत राहा; किती अवधि लागेल त्याची नका पर्वा करुं; तेच आंकडे फिरुन आलेच पाहिजेत. किती वेळां फेंकल्यानंतर ते आंकडे येतील हें निश्चित नाही सांगतां येणार. हा नियम योगायोगाचा आहे. अगदीं असेंच जीवात्म्याच्या आणि त्याच्या संबंधांच्या बाबतींत आहे. मध्यंतरीं मग कितीही काळ जावो, तेंच संघटन आणि तेंच विघटन पुनः पुनः आलें पाहिजे. पुन्हा पुन्हा तोच जन्म, तेंच खाणें, तेंच पिणें व मग मृत्यु. कांहींना भौतिक सुखाच्या उपभोगाहून श्रेष्ठ असें कांहीं दिसतच नाहीं. पण ज्यांना उच्चतर अवस्था गांठायच्या असतात त्यांना हें समजतें कीं हे भोग म्हणजे जीविताचा अंतिम किंवा प्रधान हेतु नसून ते गौण आहेत.


अगदीं क्षुद्र कीटकापासून मनुष्यापर्यंत सारीं रुपें किंवा सारीं शरीरें ही शिकागोतील ' फेरीस व्हीलला ' ( रहाट पाळण्याला ) बसण्यासाठीं जोडलेल्या गाड्यांप्रमाणें आहेत. त्या गाड्या सदैव फिरत असतात; त्यांत बसणाऱ्या व्यक्ति मात्र बदलत असतात. एखादी व्यक्ति त्या गाडींत जाते, चक्राबरोबर फिरते आणि मग बाहेर येते. तें चक्र सारखें फिरत असतें. जीवात्माही तसाच; तो एका शरीरांत जातो तेथें कांही काल राहतो, मग दुसऱ्यांत जातो आणि तेंही टाकून पुढें तिसऱ्यांत जातो. तो त्या चक्रांतून बाहेर पडून मुक्त होईपर्यंत त्याचें तें चक्र ( जन्ममरणरुपी चक्र ) सारखें चालू असतें.

मनुष्यांच्या जन्मांतील भूत किंवा भावी गोष्टी जाणण्याच्या अद्‌भुत शक्ति प्रत्येक देशांत आणि प्रत्येक काळांत आम्हांला दिसून आल्या आहेत. याचें स्पष्टीकरण असें कीं जीवात्मा आपलें स्वातंत्र्य पूर्णपणे गमावून बसलेला नसतो. त्याला आपलें अस्तित्व प्रस्थापित करतां येतें हें खरें;

एवढेंच नव्हे तर जसें मुक्तात्मे करुं शकतात तसें- त्याला कार्यकारणाच्या शृङ्खलेतून देखील निसटतां येतें. तरीपण जोंवर तो कार्यकारणाच्या कक्षेंत असतो तोंवर कार्यकारण नियमाचा त्याच्यावर बराचसा पगडा असतो, आणि कार्यपरंपरेचें ज्ञान करुन घेण्याची ज्यांच्या अंगीं शक्ति असते अशांना अतीत किंवा भावी कालच्या गोष्टी सांगणें शक्य होत असतें.

कोणतीही इच्छा बाळगणें किंवा कोणत्याही गोष्टीची जरुरी भासणे हें निश्चितपणें अपूर्णत्वाचें द्योतक आहे. पूर्णत्वाला पोंचलेला, मुक्तात्मा कोणतीही इच्छा बाळगणार नाहीं. परमेश्वराला कशाचीच उणीव भासणें शक्य नाहीं. म्हणून ईश्वराला अमुक इच्छा झाली, त्याला क्रोध आला, तो संतुष्ट झाला, इत्यादि बोलणें ही सर्व शुद्ध बालिश बडबड आहे- तिला कांही अर्थ नाहीं. म्हणून सारे आचार्य, धर्मगुरु आम्हांला सांगतात कीं, ' कशाचीही इच्छा नका धरुं; सर्व वासनांचा त्याग करुन पूर्णपणे संतुष्ट असा. '

जगांत येत असतां, मूल रांगत रांगत आणि दंतविहीन असेंच येत असतें. जगांतून जात असतांना म्हातारा ही दंतहीन आणि रांगत रांगतच जातो. दोन्ही टोकें सारखींच आहेत; पण एकाला आपल्या पुढील जीवनाचा मुळींच अनुभव नसतो, तर दुसऱ्याने आपलें जीवन पूर्णपणे अनुभविलेलें असतें. विरुद्ध गुण देखील अतिरेकाला पोंचले असतां समान दिसतात, मग त्यांच्यांत दोन ध्रुवांएवढें अंतर असेना का. भिंतीला कामना, वासना नसतात; तसेंच पूर्णत्वाला पोंचलेल्या पुरुषालाही. पण भिंत अचेतन असते; तिच्यांत इच्छा करण्याचीही शक्ति नसते आणि या उलट पूर्णत्वाला पोंचलेल्याला त्याने ज्याची कामना करावी असें कांहीच दिसत नसतें. ज्यांना कशाचीच इच्छा नाहीं, असे कांहीं मंदबुद्धि या जगांत आहेत- त्यांना इच्छा, आकांक्षा, नसतात त्या त्यांच्या बुद्धिमांद्यामुळें - अपरिपक्व मतीमुळें. तसेंच, सर्वोच्च स्थितीला आपण पोंचलों असतां तिथेंही आम्हाला इच्छा नसतात, परंतु एकाच अस्तित्वाचीं हीं दोन विरुद्ध टोकें- दोन ध्रुव आहेत. एकटा पशुतुल्य तर दुसरा देवासमान.



**स्वामी प्रभानंद**